अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. १७ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे अंक : २० वा किंमत : ५ रुपये पाने ८

# ‘इंजिन’ची दिशा अचानक बदलली, सत्तांध भाजपची झोप उडाली

## ▪ मैदान सोडण्याचा दिला सल्ला; ▪ भाजप नेत्यांमध्ये माजला कल्ला

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात रविवारी अजून एक मोठा भूकंप झाला. त्याचा केंद्रबिंदू ‘कृष्णकुंज’वर होता. या भूकंपाने सत्ताधारी भाजपच्या पायाखालची जमीन हादरून गेली. राज्यात एकंदरीत ज्या राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत, त्या पाहाता भाजप-शिंदे गट व मनसे यांची युती होईल, अशी चर्चा रंगलेली असतानाच मनसेच्या ‘इंजिन’ने अचानक दिशा बदलली. त्यामुळे भाजप नेत्यांची पाचावर धारण बसली. अंधरी पूर्व विधानसभेच्या पोटनिवडणुकित भाजपने आपला उमेदवार मागे घ्यावा, असे पत्र राज ठाकरे यांनी धाडल्यामुळे राज्यात खळबळ उडाली आहे. राज यांनी एकाएकी अशी कल्टी मारल्यामुळे भाजप-मनसे यांची युती होण्याची शक्यता मावळल्याचे मानले जात आहे तसेच राज यांचे हे लेटरबॉम्ब म्हणजे ठाकरे घराण्यात पुन्हा एकी होण्याचे हे पाऊल पडलेले असावे,असे राजकीय जाणकारांना वाटत आहे.

अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडमोडींना वेग आला आहे. या मैदानात उद्धव ठाकरे गटाच्या ऋतुजा लटके आणि भाजपचे उमेदवार मुरजी पटेल यांच्यात थेट लढत होणार आहे. ही लढाई जिंकण्यासाठी शिंदे गट-भाजप तसेच उद्धव ठाकरे गट पूर्ण ताकदीने मैदानात उतरले असून प्रचाराला सुरुवातही झाली आहे. या पोटनिवडणुकीमध्ये मनसेची भूमिका काय असेल? असा प्रश्न सर्वांनाच पडला होता. असे असतानाच मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या निवडणुकीसंदर्भात भाजपला आवाहन केले आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले असून भाजपाने ही निवडणूक लढवू नये, अशी विनंती केली आहे.



**आज पिच्चर फायनल...**
अंधेरीच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत सोमवार दि.१७ ऑक्टोबर आहे. अर्ज मागे घेतल्यानंतर खरी लढत कुणामध्ये होणार हे स्पष्ट होणार आहे. राज यांच्या पत्रानुसार भाजपच्या मुरजी पटेल यांनी अर्ज मागे घेतला तरी ऋतुजा लटके यांच्यापुढे अन्य उमेदवारांचे आव्हान नक्की असेल.

### ▪ ‘आत्मा’ दिसू लागला :

राज यांना दिवंगत रमेश लटके यांचा आत्मा दिसू लागला की काय? असे त्यांनी फडणवीस यांना धाडलेल्या पत्रातून दिसत आहे. कारण माघार घेण्याविषयीचे एक मजेशीर कारण राज यांनी त्यात नमूद केले आहे. रमेश हे चांगले कार्यकर्ते होते. अगदी शाखा प्रमुखापासून त्यांची वाटचाल सुरू झालेली आहे. त्यांच्या राजकीय प्रवासाचा मी एक साक्षीदार आहे. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी आमदार झाल्याने त्यांच्या आत्म्याला खरोखर शांती मिळेल, असे राज यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

### ▪ ...ओम शांती शांती... :

दरम्यान राज यांच्या या पत्रावर फडणवीस यांची ओम शांती शांती...ची भूमिका दिसून आली.यासंदर्भात पत्रकारांनी छेडले असता ते म्हणाले की- राज ठाकरे यांनी चांगल्या भावनेने हे पत्र लिहिले असून आम्ही त्यांच्या पत्राचा नक्कीच विचार करू.भाजपामध्ये मी एकटा निर्णय घेऊ शकत नाही. मला पक्षातील सहकाऱ्यांशी, वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करावी लागेल. तसेच बाळासाहेबांची शिवसेनादेखील आमच्यासोबत आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्याशीही मला चर्चा करावी लागेल. त्यानंतरच योग्य तो निर्णय घेता येईल.

### ▪ थोडा उशीर झाला :

राज ठाकरे अंधेरीत शिवसेनेला पाठिंबा देतील का? असा प्रश्न विचारला असता अरविंद सावंत म्हणाले, अंधेरीत राज ठाकरे यांनी शिवसेनेच्या उमेदवार ऋतुजा लटके यांना पाठिंबा द्यावा की नाही हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांनी ही पहिली भूमिका मांडली त्याला थोडा उशीर झाला. असे असले तरी ही भूमिका स्वागतार्ह आहे. ती महाराष्ट्राची संस्कृती आहे. त्यांनी या संस्कृतीची भाजपाला आठवण करून दिली हेही खूप झाले.

### ▪ डाळ शिजली कुठे? :

शनिवारी मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशीच राज यांनी लेटरबॉम्ब टाकावा; याचाच अर्थ मुख्यमंत्री शिंदे व राज यांच्यात ही डाळ शिजल्याचा संशय आता व्यक्त होऊ लागला आहे. दोनच दिवसांपूर्वी जयदेव ठाकरे यांचे सुपुत्र तथा उद्धव यांचे पुतणे जयदीप यांनी ठाकरे घराण्यातील प्रत्येक व्यक्तीने एकत्र यायला हवे,असे सांगितले होते.त्यापाठोपाठ राज यांचे हे पत्र म्हणजे ठाकरे घराण्यात पुन्हा एकोपा होण्याची चिन्हे दिसत आहेत. पण यासंदर्भात उद्धव यांची भूमिका काय असेल त्यावरच त्या घराण्याच्या एकोप्याचे भवितव्य अवलंबून असेल.

## अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवले

सोलापूर : शहरातील एका मध्यवर्ती शाळेत शिकत असलेल्या अल्पवयीन मुलीस अज्ञात व्यक्तिंने कशाचे तरी आमिष दाखवून फुस लावून पळवून नेल्याची तक्रार अल्पवयीन मुलीच्या आईने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात केली आहे. नेहमीप्रमाणे त्या मुलीच्या भावाने तिला सकाळी कॉलेजमध्ये सोडले.

दुपारच्या वेळेस आई मुलीला आणण्यासाठी गेली असता ती तिथे आढळली नाही. आजूबाजूच्या मुलीस विचारले असता ती आत्ताच निघून गेली असे मुलींनी सांगितले. त्यानंतर त्या मुलीच्या आईने तिच्या दोन विवाहित मुलींकडे तसेच नातेवाईकाकडे चौकशी केली असता ती आढळून आली नाही.त्यामुळे अज्ञात व्यक्तिच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## अंगावर वीज पडून जांभूड येथे शेतकऱ्याचा मृत्यू

सुराज्य/श्रीपूर

माळेवाडी जांभूड तालुका माळशिरस येथील संभाजी वासुदेव कदम वय ५५ याचा दुपारच्या सुमारास अंगावर वीज पडून मृत्यू झाला आहे.

अधिक वृत्त असे की श्रीपुर जांबुड, नेवरे परिसरामध्ये गेली अनेक दिवसापासून सतत पाऊस पडत आहे. माळेवाडी जांभूड तालुका माळशिरस येथील संभाजी वासुदेव कदम हे दिनांक १६ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास शेतामध्ये आपली जनावरे चारण्यास गेले होते. यावेळेस अचानकपणे पाऊस आल्याने विजेचा कडकडाट सुरू



झाल्याने शेतामधील एका झाडाच्या खाली संभाजी कदम हे आडोशाला उभे राहिले असता त्यावेळी झाडावरती वीज कोसळून कदम याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सदरची घटना माळेवाडी परिसरात कळताच तातडीने संभाजी कदम याला दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## आजारास कंटाळून शहरात दोन ठिकाणी गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

शहर परिसरात दोन विविध ठिकाणी आजारास कंटाळून एका महिलेसह दोघांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची नोंद रविवारी पोलिसात झाली आहे.

त्यापैकी पहिली घटना भवानी पेठेतील वर्धमान हाइट्स येथे सकाळी उघडकीस आली. चंद्रकला चंद्रकांत रेवणकर (वय ६३) असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. तिचा मृतदेह बेडरूम मधील छताच्या लोखंडी हुकाला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.तिच्या पश्चात पती आणि दोन मुले असा परिवार आहे. तिला मानसिक आजार होता. त्यातून तिने हा प्रकार केला अशी प्राथमिक नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली. हवालदार ओहोळ पुढील तपास करीत आहेत.

दुसरी घटना एमआयडीसी परिसरातील शिवलिंग नगर येथे



सायंकाळच्या सुमारास घडली. अंबण्णा पीरप्पा चिवडशेट्टी (वय ७२) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. सायंकाळी ५ वाजेच्या पूर्वी घरात कोणी नसताना त्याने छताच्या लोखंडी पाईपला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.

पोलिसांनी दरवाजा उचकटून मृतदेह ताब्यात घेतले. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले नातवंडे असा परिवार आहे. दम्याच्या आजारास कंटाळून त्याने हा प्रकार केला. अशी प्राथमिक नोंद एमआयडीसी पोलिसात झाली. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत .

## पतीने पत्नीच्या डोक्यात घातला वरवंटा

सुराज्य/सोलापूर

मला तुझ्या माहेरी काम धंदा मिळत नाही.आपण पंढरपूरला निघून जाऊ.असा तगादा लावून रागाच्या भरात आरोपी संतोष तात्याबा पवार (रा.रेणुका नगर जुळे,सोलापूर) याने पत्नी रेश्मा हिच्या डोक्यात दगडी वरवंटा मारून गंभीर जखमी करून ठार मारण्याचा प्रयत्न केला.याप्रकरणी विजापूरला नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकिकत अशी की, संतोष तात्याबा पवार हा आपल्या पत्नीबरोबर सासरी राहावयास होता.या ठिकाणी तो कामाचा शोधात असताना त्याला काम मिळत नव्हते. त्यामुळे तो पत्नीवर चिडून होता.

घटनेच्या दिवशी त्यांनी पत्नीबरोबर भांडण काढून आपण पंढरपूरला निघून जाऊ असा तगादा लावला.परंतु पत्नी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. त्यामुळे चिडून जाऊन संतोष पवार यांनी जवळच पडलेला वरवंटा पत्नीच्या डोक्यात मारून गंभीर जखमी केले.ही घटना आरोपी भाऊजी वेंकटप्पा नागनाथ घोडके यांना कळल्याने तो तात्काळ त्या ठिकाणी आला.

त्याठिकाणी बहीण बेशुद्ध अवस्थेत पडली होती. तिच्या डोक्यातून व कपाळातून रक्त येत होते. पत्नीला गंभीर जखमी करून संतोष याने भाच्याला मोटरसायकलवर घेऊन तिथून पलायन केले.घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक जगताप करीत आहे.

## रेल्वेच्या धडकेने एक जण ठार

सोलापूर : आहेरवाडी (ता.दक्षिण सोलापूर) येथे रेल्वेच्या धडकेने महेबूब रमजान शेख (वय ३५ रा.आहेरवाडी) हे गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वीच मयत झाले. ही दुर्घटना आज रविवारी दुपारी १२ वाजेच्या पूर्वी घडली. त्याला वळसांच्या पोलिसांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला. पुढील तपास हवालदार करपे करीत आहेत.

## आई सोबत भांडण करून इसमाने केली आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

दारूच्या नशेत आईसोबत भांडण केल्यानंतर एका ३४ वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना कुमठा नाका परिसरातील संजय नगरात रविवारी दुपारच्या सुमारास घडली.

विपुल मधुकर बनसोडे (वय ३४ रा.संजय नगर) असे मयताचे नाव आहे. दुपारी एक वाजेच्या सुमारास त्याने दारूच्या नशेत आईसोबत भांडण केले. त्यानंतर रागाच्या भरात त्याने घरातील छताच्या लोखंडी अँगलला साडीने गळफास घेतला होता.

त्याला फासातून सोडवून विशाल (भाऊ) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. मात्र तो उपचारापूर्वीच मयत झाला. या घटनेची नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

## एमआयडीसी येथे उंचावरून खाली पडल्याने मजूर ठार

सुराज्य/सोलापूर

चिंचोळी एमआयडीसी येथील बालाजी अमाईन्सच्या आवारात पत्रे बसवताना २० ते २५ फूट उंचावरून खाली कोसळल्याने आकाश अनिल माने (वय २८ रा.भोगाव ता.उत्तर सोलापूर) हा तरुण गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावला.

रविवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास तो इतर




कामगारा सोबत उंचावर चढून पत्रे बसवीत होता. त्यावेळी हा प्रकार घडला. त्याला शिवम कुट्टी (ठेकेदार) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मागे राहते ती सावली..

## शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, सरसकट पंचनामे करा : विखे-पाटील

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात संततधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. यासाठी सरसकट पंचनामे करावेत, अशा सूचना महसूलमंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिल्या.

पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या ३२ व्या गळीत हंगाम शुभारंभ व आसवनी प्रकल्प उद्घाटन शुभारंभाप्रसंगी पालकमंत्री विखे- पाटील बोलत होते. यावेळी खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, संत दामाजी सह.साखर कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील, पांडुरंग सह.साखर कारखान्याचे



संचालक उमेश परिचारक, धैर्यशील मोहिते-पाटील, अप्पर जिल्हाधिकारी संजीव जाधव, प्रांताधिकारी ज्योती कदम, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवपुजे, तहसीलदार जगदीश निंबाळकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना पालकमंत्री विखे-पाटील म्हणाले, जिल्ह्यात अतिवृष्टी व सततच्या पावसाने शेतपिकांसह जमिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेऊन या नुकसानीचे पंचनामे करण्याला प्राधान्य द्यावे. सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे पूर्ण करून तसा अहवाल शासनाला तात्काळ सादर करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

केंद्र शासनाने साखर धोरणाची निश्चिती केल्याने सहकार क्षेत्र टिकले आहे. साखर कारखान्याला इथेनॉलचे धोरण वाचविणार असून, साखर कारखान्यांनी इथेनॉल निर्मितीबरोबरच इतर उप-पदार्थ निर्मिती करावी. पांडुरंग सहकारी साखर कारखान्यांनी सहवीज , इथेनॉल तसेच पोटॅश निर्मिती बरोबरच योग्य व्यवस्थापन केल्याने राज्यासमोर नवा आदर्श निर्माण केल्याचे पालकमंत्री विखे-पाटील यांनी सांगितले. तत्पूर्वी पालकमंत्री विखे-पाटील यांनी जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतपिकांची हेलिकॉप्टरमधून पाहणी केली.

उजनी धरणातील हक्काचे पाणी सोलापूर जिल्ह्याला मिळावे अशी मागणी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी केली. तर सोलापूर जिल्ह्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने ती तत्काळ भरावीत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानीबाबत जादाचा मोबदला मिळावा ,अशी मागणी आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केली. पांडुरंग सहकारी साखर कारखाना साखर उद्योगावरच अवलंबून न राहता वीज निर्मिती, इथेनॉल निर्मिती, पोटॅश निर्मिती व उत्तम व्यवस्थापन केल्याने शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे उसाला दर देता आला. श्री.पांडुरंग सहकारी साखर कारखान्याला राज्य व राष्ट्रीय पातळीवर विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सांगितले.

# महामंडळे कोणासाठी?

राज्यातील काही विकास महामंडळे पुन्हा सुरू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वीच जाहीर केला. केंद्रासह राज्य सरकारे अति लोकानुनय थांबवतील, असे वाटत नाही. अर्थव्यवस्थेची दक्षता घेण्याऐवजी प्रत्येक राजकीय पक्षाला सत्ता महत्त्वाची वाटू लागली आहे. कुठल्याही थराला जाऊन आमिषे दाखवायची, आश्वासनांचा पाऊस पाडायचा आणि मते मिळवायची हा धंदा साऱ्या राजकीय पक्षांचा होऊन गेलाय. महामंडळे पुन्हा सुरू करण्याचा नव्या सरकारचा निर्णय हा त्यात विकृतीत मोडणारा आहे. सध्या शरपंजरीवर असलेल्या विकास मंडळांची पुनर्स्थापना केली जाणार आहे. त्याचा खरोखर उपयोग होईल का? हा खरा प्रश्न आहे. राज्याच्या समतोल विकासासाठी प्रादेशिक विकास मंडळांची गरज होती आणि आजही ती आहे. त्यामुळे मराठवाडा, विदर्भ, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाच्या पुनर्स्थापनेचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्राकडे पाठवला. अनुच्छेद ३७१ (२) अन्वये राज्याच्या समतोल विकासाची जबाबदारी कायद्यान्वये राज्यपालांकडे देण्यात आलेली आहे. मागास भागाच्या विकासासाठी योग्य प्रकारे निधी दिला जातो का, दिलेल्या निधीची अंमलबजावणी नीट होते आहे का, याची राज्यपालांकडून निगराणी व्हावी, असे अपेक्षित होते. हे झाले कायद्याचे. सर्वसाधारणपणे आतापर्यंत विकास मंडळे केवळ राजकीय सोय म्हणून वापरली गेली. हे सत्य नाकारताच येणार नाही. पश्चिम महाराष्ट्र, पुणे, मुंबई आणि उत्तर महाराष्ट्राच्या तुलनेत राज्यातील विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकासात मागे आहे.



हे मागासलेपण १ एप्रिल १९९४ रोजी निर्देशांक आणि अनुशेष समितीने काढले होते. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रात सिंचन, ऊर्जा आणि रस्ते या क्षेत्रातील अनुशेष काढण्यात आला होता. त्यानुसार विदर्भात सिंचनाचा अनुशेष ५५.०४, मराठवाड्यात ३२.३७ आणि उर्वरित महाराष्ट्रात १२.५९ टक्के एवढा होता. अन्य क्षेत्रांतीलही मागासलेपणाचा शिक्का कायम असल्याची आकडेवारी जाहीर होऊन २८ वर्षे होत आली आहेत. परिस्थिती थोडीशी बदलली आहे. पण विकास आणि मागासपणाची दरी मात्र कायम आहे. विशेषत: अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये सिंचनाचे अनुशेष अजूनही शिल्लक आहेत. या भागातले मागासलेपण दूर करण्यासाठी निधीची तरतूद कोणत्या भागातून काढावी आणि कोणत्या भागात वळवावी, याचे निर्देश राज्यपालांना देता येतात. त्यामुळे प्रादेशिक विकास मंडळांची आवश्यकता आहे. मात्र, गेले दशकभर ही विकास मंडळे मरणासन्न स्थितीत होती. १९९४मध्ये वित्तीय अनुशेष ५,४१८ कोटी एवढा होता. वर्ष २०००मध्ये आर्थिक मापदंड लक्षात घेऊन तो १०६१८.३७ कोटी असा करण्यात आला आणि मार्च २०११पर्यंत सर्व जिल्ह्यांमधील वित्तीय अनुशेष भरून निघाला आहे, असाही सरकारचा दावा होता. मात्र, ठरलेले पैसे दिले तरी विकासामध्ये फारशी सुधारणा झाली नाही. राज्याच्या समतोल विकासासाठी वि. म. दांडेकर यांनी दिलेल्या अहवालानुसार काही बाबी पुढे सरकल्या. सिंचनाच्या क्षेत्रात विदर्भ आणि मराठवाड्याला अधिकचा निधी द्यावा लागेल आणि तो निधी कायद्यामुळे बंधनकारक झाल्यामुळे राज्यकर्त्यांचे हात बांधले गेले. त्यामुळे अर्थसंकल्पात आणि पुरवणी मागण्यांमुळे निधीच्या तरतुदीला राज्यपालांनी घालून दिलेले सूत्र राज्यकर्त्यांना पाळावे लागले. परिणामी विकास मंडळे स्थापन झाल्यानंतर पहिली काही वर्षे त्याचा निश्चितपणे उपयोग झाला. पण पुढे निधीची तरतूद झाल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीमुळे अनेक प्रकारचे घोळ घातले गेले. परिणामी निधीचे आकडे फुगले आणि विकास आहे तिथेच राहिला. २०१९ ते २०२२ या कालावधीसाठी दोन लाख २३ हजार २६४ हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याचा कार्यक्रम सादर झाला. पण अजूनही सिंचनाचा अनुशेष बाकी आहे. यात हिंगोली जिल्ह्याचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. या जिल्ह्यात ८०४५ हेक्टर जमिनीचा सिंचन अनुशेष अजूनही बाकी आहे. पाच आंतरराज्य प्रकल्पांना प्राधान्याने निधी मिळण्याची आवश्यकता असल्याचे राज्यपाल आणि राज्य सरकारनेही तसे निर्देश दिले. राज्यात बहुमताच्या आधारे सरकारे स्थापन झाली नाहीत. त्यामुळे दोन पक्षांच्या आघाडी किंवा युतीमध्ये मंत्रिमंडळात स्थान न मिळालेल्या नाराज कार्यकर्त्यांची वर्णी महामंडळावर लावली जात असे. काँग्रेसचे मधुकरराव चव्हाण आणि भाजपचे डॉ. भागवत कराड या मराठवाड्यातील मंडळींची नियुक्ती राजकीय सोयच मानली जाते. वैधानिक विकास मंडळाचा कारभार सुधारला नाही तो नाहीच. तो सुधारेल, याची खात्री मात्र कुणी देत नाही.

---

आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिन

# जीवन संघर्षाचे भयावह संकट

**आदरणीय महोदय,**

**दरवर्षी जागतिक गरिबी निर्मूलन दिन १७ ऑक्टोबर रोजी जगभरात गरिबी कमी करणे आणि जीवनमान उंचावणे या उद्देशाने साजरा केला जातो. दारिद्र्यतेची समस्या जगभरात असून आपल्या देशात मोठ्या प्रमाणात वाढत आहे, ही गरिबीची समस्या इतर गंभीर समस्यांना जन्म देते ज्यामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये अडथळा येतो. या अत्यंत गंभीर विषयावर हा खास लेख...**

आज आपण आधुनिक तंत्रज्ञान युग आणि जागतिक महासत्तेबद्दल बोलतो, परंतु आजही रुग्णालयातून रुग्णवाहिकेसाठी पैसे नसल्यामुळे लोक आपल्या कुटुंबीयांचे मृतदेह खांद्यावर घेऊन जाताना दिसतात. दुर्गम आणि मागासलेल्या भागात आजही निरागस मुले नदी-नाले, वने, खडबडीत रस्ते ओलांडून शाळेत जात आहेत. अनेक ग्रामीण महिला पाण्यासाठी दररोज लांबचा प्रवास करतात. आजही आपल्या देशातील अनेक ग्रामीण भागात मूलभूत वैद्यकीय सेवांच्या अभावामुळे आपत्कालीन परिस्थितीत जीव धोक्यात येतो. आजही अनेक असहाय्य लोक रस्त्यालगतच्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून अन्न शोधताना दिसतात. बालकांना उपासमारीने प्राण गमवावे लागण्याच्या आणि गरिबीच्यामुळे अनेक पालकांना आपले अपत्य विकावे लागण्याच्या अशा अनेक हृदयद्रावक घटना बातम्यांमधून ऐकायला वाचायला पाहावयास मिळतात.

गरिबीत जीवनसंघर्ष माणसाला कोणत्या मार्गावर नेईल हे सांगता येत नाही. गरिबीत जीवनासाठी माणसाला अनेक वेळा अशा मजबुरीतून जावे लागते, ज्याचा तो विचारही करू शकत नाही. गरिबीत जन्मलेल्या मुलांचा जीवन संघर्ष जन्मापासूनच सुरू होतो. पोषक तत्त्वांनी समृद्ध अन्न मिळणे तर दूरच, पहिले दोन वेळच्या भाकरीसाठी संघर्ष सुरू होतो, मग आरोग्य-शिक्षण सुविधांसाठी संघर्ष होतो, शिक्षणानंतर नोकरीसाठी संघर्ष, जगण्यासाठी आवश्यक सुविधांसाठी संघर्ष असतो, शुद्ध हवा, पाणी आणि राहण्याचा सोयीसाठी आयुष्यभर संघर्ष सुरू असतो. भेदभाव, भ्रष्टाचार, उच्च-नीच अशा विचारधारा आल्या तर या गरिबीच्या जीवनाचा संघर्ष आणखीनच भयावह होतो. दरवर्षी १७ ऑक्टोबर रोजी आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिन जगभरात गरिबी कमी करणे आणि जीवनमान उंचावणे या उद्देशाने साजरा केला जातो. या वर्षी २०२२ च्या आंतरराष्ट्रीय गरिबी निर्मूलन दिवसाची मुख्य थीम व्यवहारात सर्वांसाठी सन्मान आहे.

गरिबीचा वाढता दर देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये अडथळा आणतो, जेव्हा देशाची मोठी लोकसंख्या मूलभूत सेवा खरेदी करण्यात किंवा फायद्यांपासून वंचित असते तेव्हा आर्थिक विकास साध्य करणे अधिक कठीण होते. गरिबीसारख्या समस्यांमुळे इतर अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात ज्याचा परिणाम लोकांच्या जीवनमानावर अतिशय वाईट होतो. गरिबीमध्ये आरोग्य आणि शिक्षणाची निम्न पातळी, भूक आणि कुपोषण, अशुद्ध हवा-पाणी वातावरण, चांगल्या जीवनासाठी फार कमी संधी, सामाजिक भेदभाव आणि बहिष्कार तसेच निर्णय घेण्यात सहभागाचा अभाव, अपुरी सुरक्षा-क्षमता यांचा समावेश होतो. गुन्हेगारी, झोपडपट्टी, अंमली पदार्थांचे व्यसन, रोगराई वाढविण्यास दारिद्र्यता सहायक असू शकते. लिंग व जातीय भेदभाव, भ्रष्ट प्रशासन, संघर्ष, शोषण, अत्याचार आणि घरगुती हिंसाचार यांसह असमानता देखील गरिबी वाढविण्यात कारणीभूत ठरते. बेरोजगारी वाढतच आहे, डॉलरच्या तुलनेत रुपयाचे अवमूल्यन सुरूच आहे. अशिक्षित आणि गरीब लोक जे मिळेल ते काम करायला किंवा मजुरी सुद्धा करायला तयार असतात, मात्र आज महागाईची परिस्थिती सामान्य मध्यमवर्गीय सुशिक्षित लोकांचा जीवनसंघर्षही कठीण करत आहे, आर्थिक विवंचनेमुळे सर्वसामान्य मध्यमवर्गीय लोकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण चिंताजनक वाढले आहे. शिक्षण आणि बेरोजगारीची ही परिस्थिती आहे की, शिक्षणानुसार नोकऱ्या मिळत नाहीत, त्यामुळे उच्चशिक्षित उमेदवारही मोठ्या संख्येने चतुर्थ श्रेणीच्या पदासाठी अर्ज करत आहेत.

**वाढती आर्थिक असमानता शिखरावर :-** जागतिक असमानता अहवाल २०२२ नुसार जगातील सर्वात टोकाची असमानता भारत देशात दिसून आली आहे. देशातील शीर्ष १० टक्के लोकसंख्येकडे राष्ट्रीय उत्पन्नाचा ५७% हिस्सा आहे, ज्यापैकी शीर्ष १ टक्के लोकांकडे २२% आहे, जे १९९० मध्ये ११ टक्के होते. देशाच्या एकूण संपत्तीमध्ये तळाच्या ५०% लोकांचा वाटा केवळ १३% आहे, हे लोक वार्षिक ५३१६० रुपये कमवत आहेत आणि लोकसंख्येच्या शीर्ष १०% लोक ११६६५२० रुपये कमावत आहेत. गिनी (उत्पन्न वितरणातील असमानता) गुणांक देशातील वाढती असमानता दर्शवते. गुणांक २०१४ मध्ये ३४.४% वरून २०१८ मध्ये ४७.९% पर्यंत वाढला. अहवालात असेही दिसून आले आहे की गेल्या दशकात तणाव, दुःख, राग आणि चिंता वाढली आहे, ज्या आता विक्रमी पातळीवर पोहोचल्या आहेत. संपत्तीसोबतच देशाला स्त्री-पुरुष समानता आणि वांशिक समानतेचीही गरज भासताना दिसते.



**उपासमार आणि कुपोषणाची परिस्थिती गंभीर:-** युनायटेड नेशन्सच्या म्हणण्यानुसार, दररोज, १०००० पेक्षा जास्त मुलांसह २५००० लोक उपासमार आणि संबंधित कारणांमुळे मरतात. जगभरात सुमारे ८५४ दशलक्ष लोक कुपोषित असल्याचा अंदाज आहे आणि अन्नधान्याच्या उच्च किंमतीमुळे आणखी १०० दशलक्ष गरिबी आणि उपासमारीचे शिकार होऊ शकतात. भारतात कुपोषणाचे प्रमाण १४.८% आहे, जे जागतिक आणि आशिआई सरासरीपेक्षा जास्त आहे. २०१७ मध्ये राष्ट्रीय आरोग्य सर्वेक्षणानुसार देशातील सुमारे १९ कोटी लोक दररोज रात्री उपाशीपोटी झोपण्यास लाचार होते. याशिवाय देशात दररोज सुमारे ४५०० बालकांचा उपासमार आणि कुपोषणामुळे मृत्यू होत असल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. ऑक्सफॅमच्या अहवालानुसार, दर मिनिटाला किमान ११ लोक उपासमार आणि कुपोषणामुळे मरत आहेत. जगात अन्न उपलब्ध नसलेल्या लोकांची संख्या ७०० दशलक्ष वरून ८२१ दशलक्ष झाली आहे. उपाययोजना असूनही, गेल्या पाच वर्षांत अन्न असुरक्षित असलेल्या लोकांच्या संख्येत हळूहळू वाढ होत आहे.

**जागतिक स्तरावर भारताचे स्थान :-** जागतिक बहुआयामी गरिबी निर्देशांक २०२१मध्ये भारत १०९ देशांपैकी ६६ व्या क्रमांकावर आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स २०२१मध्ये, भारत ११६ देशांपैकी १०१ व्या क्रमांकावर आहे, २७.५ च्या स्कोअरसह भारतामध्ये तीव्र भूक पातळी आहे, या क्रमवारीत पाकिस्तान, बांग्लादेश आणि नेपाळने भारताला मागे टाकले आहे.

ग्लोबल हेल्थ प्रोटेक्शन इंडेक्स २०२१ नुसार, भारत १९५ देशांमध्ये ६६ व्या क्रमांकावर आहे. ग्लोबल फूड सिक्युरिटी इंडेक्स २०२१ मध्ये भारत ११३ देशांपैकी ७१ व्या क्रमांकावर आहे. ग्लोबल युथ डेव्हलपमेंट इंडेक्स २०२० नुसार, भारत १८१ देशांपैकी १२२ व्या क्रमांकावर आहे. मानवी स्वातंत्र्य निर्देशांक २०२१ च्या जागतिक क्रमवारीत भारत ११९ व्या क्रमांकावर आहे.

रिपोर्टर्स विदाउट बॉर्डर्सने प्रकाशित केलेल्या रँकिंगनुसार, वर्ल्ड प्रेस फ्रिडम इंडेक्सच्या २०व्या आवृत्तीनुसार, भारत १८० देशांमध्ये १५० व्या क्रमांकावर आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या ग्लोबल जेंडर गॅप इंडेक्स रिपोर्ट २०२२ मध्ये भारत १४६ देशांपैकी १३५ व्या क्रमांकावर आहे. जागतिक बँकेने २०२० साठी मानवी भांडवल निर्देशांक अहवाल जारी केला, ज्यामध्ये भारत १८० देशांपैकी ११६ व्या क्रमांकावर आहे. युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या अहवालात असे दिसून आले आहे की, मानव विकास निर्देशांक २०२१ मध्ये भारत एकूण १९१ देशांपैकी १३२ क्रमांकावर आहे. आर्थिक स्वातंत्र्य निर्देशांक २०२० मध्ये भारत १०५ व्या क्रमांकावर आहे. जागतिक विद्यापीठ क्रमवारीत २०२१-२२मध्ये स्थान मिळविणारी देशातील पहिली संस्था म्हणजे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, अहमदाबाद जागतिक स्तरावर ४१५ व्या क्रमांकावर आहे. नीती आयोगानुसार, भारतातील २५ टक्के लोकसंख्या गरीब आहे, अर्थात एकूण लोकसंख्येपैकी प्रत्येक चौथा माणूस गरिबीत आहे. जगातील ११७ देशांपैकी भारत पाचव्या क्रमांकाचा प्रदूषित देश आहे. २०२१ मध्ये, दक्षिण आणि मध्य आशियातील १५ सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी १२ शहरे भारतातील होती. जगात फक्त तेच देश विकसित झाले आहेत ज्यांनी शिक्षण, आरोग्य, रोजगार यांना प्रोत्साहन दिले आहे आणि या गोष्टी चांगल्या जीवनमानासाठी आणि गरिबी निर्मूलनासाठी सर्वात महत्त्वाच्या आहेत.

**- डॉ. प्रितम गेडाम.**

---

टुडेज् ब्लॉग

# मज फुलही रुतावे...

**माणूस मुळात कटू नसतो, तो हळूहळू होत जातो...त्याला अनुभव असे विचित्र येतात की कटुता निर्माण होणं स्वाभाविक असतं. काय कारण असतं असे अनुभव येण्याचं? तसे अनुभव मग प्रत्येकालाच का नाही येत? या प्रश्नाला काही उत्तर नाही. कोणी म्हणतं नशीब, कोणी म्हणतं योगायोग, तर कोणी म्हणतं कर्म! मज फूलही रुतावे हा दैवयोग आहे!**


कारण काहीही असो. घडायचं ते घडतं.

जसं की,

एक मोठा समानधर्मी लोकांचा कार्यक्रम असतो, पण त्यात एकाही समानधर्मीला त्याला सामावून घ्यावंसं वाटत नाही, त्याच्याशी आपणहून येऊन कोणीही बोलत नाही, तो आपणहून जाऊन बोलला तरी उपचारापुरतं बोलून त्याच्या समोरून सगळे सटकतात, लांबून हसून मग त्याच्याकडे पाठच करतात, त्याच्याकडे फोन देऊन आमचा फोटो काढतोस का असं गोड आवाजात विचारतात, कार्यक्रमाचे फोटो पोस्ट करताना नेमका त्याचाच फोटो पोस्ट केला जात नाही, त्याच्या चांगल्या कामाबद्दल माहीत असूनही मुद्दाम त्याकडे दुर्लक्ष करतात, कौतुक तर लांबचीच गोष्ट, दखलही घेत नाहीत त्यानं परिवारासाठी किंवा कोणासाठीही चांगल्या मनानं केलेली कृतीही अनावश्यक किंवा बिनगरजेची आहे असं वाटतं...

**सांगू कशी कुणाला कळ आतल्या जीवाची**
**चीरदाह वेदनेचा मज शाप हाच आहे!**

ही यादी लांबतच जाते. त्याचा झगडा त्याच्या जवळच्या लोकांना माहीत असतो, पण त्यांच्या दृष्टीने तो क्षुल्लक असतो किंवा त्याची आच त्यांच्यापर्यंत पोचत नाही. शिवाय स्वत:चे हितसंबंध, प्रतिमा याची काळजी त्यांना जास्त असते. त्यामुळे कोणाकडूनही उघड पाठिंबा मिळत नाही, inclusion होत नाही, सहानुभूती देखील नाही. उलट त्याचे दोषच परत परत त्याला दाखवून दिले देतात...तुझे vibes negative आहेत,



तुझ्याकडे tact नाही, तू फार स्पष्ट बोलतोस किंवा मग जग हे असंच असतं वगैरे वगैरे...ही यादीही लांबत जाते.

**काही करू पाहतो, रुजतो अनर्थ तेथे**
**माझे अबोलणे ही विपरीत होत आहे**

मग माणसाला प्रश्न पडायला लागतात, self doubt च्या वावटळीत तो भिरभिरत राहतो. दुखावला जातो आणि दुखावून घेत राहतो. What more should I do, so that I am accepted??? माझ्यात असतील दोष, पण तुमच्यातही असतील ना? तुमच्यात जसे गुण असतील तसे माझ्यातही आहेत. मग तुम्हांला सगळे हवेहवेसे, फक्त मी का नकोसा, असं का? मग कोणी म्हणतं नशीब, कोणी म्हणतं योगायोग, तर कोणी म्हणतं कर्म!

माणूस एकटा पडत नाही, पाडला जातो. कोणालाच एकटं राहायला आवडत नाही. गप्पा मारायची, आपलं काही शेअर करण्याची, दुसऱ्याचं ऐकायची, पाहायची, त्याबद्दल बोलायची इच्छा, ऊर्मी प्रत्येकालाच असते. पण तरीही एकटेपण अपरिहार्यपणे येतं, कारण you just don't fit, no matter what you do. त्याला मुळातून, तो आहे तसं स्वीकारणारं कोणी नसतं.

**हा स्नेह वंचना की, काहीच आकळेना**
**आयुष्य ओघळूनी मी रिक्तहस्त आहे!**

आणि मग माणूस कटू होतो.


आणि तो तसा एकदाचा करून टाकला की मग लोक म्हणतात, तो एकलकोंडा आहे, शिष्ट आहे, माणूसघाणा आहे.

**- पूनम.**

---

बोधकथा

## वेळेचे महत्त्व



एक स्वार आपल्या घोड्याला खरारा करून त्याच्यावर खोगीर घालत असता घोड्याच्या एका पायाच्या नालाचा एक खिळा सुटून पडला आहे असे त्याला दिसले. पण तेथे दुसरा खिळा बसविण्याचे काम त्याने मागे टाकले.

काही वेळाने लढाईवर जाण्याचे इशारे देण्याचे शिंग वाजू लागताच तो स्वार आपल्या घोड्यावर बसून लढाईच्या जागेकडे निघाला. त्या फौजेच्या सेनापतीने हुकूम सोडला की, 'सर्वांनी आपले घोडे भरधाव सोडून शत्रूंवर तुटून पडावे व त्यांचा पाठलाग करावा.' हुकमाप्रमाणे तो स्वार आपला घोडा उडवीत चालला असता खिळा पडल्यामुळे सैल झालेला घोड्याचा नाल गळून पडला व त्यामुळे घोडा लंगडत लंगडत चालू लागला. लंगडताना एका दगडावर त्याचा पाय आपटल्यामुळे स्वार घोड्यावरून खाली पडला व तो शत्रूच्या हाती सापडताच शत्रूने लगेचच त्याला मारले.

**तात्पर्य : - जेंव्हाचं काम तेंव्हा न करता ते आळसाने पुढे ढकलणे ही सवय वाईट व घातक आहे.**

---

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल -१



तो धर्मासोबत जातो. त्यावेळी आपल्यासोबत केवळ आपला धर्मच येत असतो. दुसरा कोणीही येऊ शकत नाही. ना धन, ना घर, ना पत्नी, ना पुत्र. तुमच्या पुत्राने तुमच्या मृत्यूनंतर जर दान-धर्म केला तर तो मात्र तुमच्या सोबत येईल. तुमच्या अंगावरील सुवर्णालंकार ते ओढून काढतील. मेल्यावर याला अलंकारांचा काय उपयोग? असे म्हणतील, कमावलेली सारी संपत्ती तुम्हांला इथेच सोडून द्यायची आहे. तुमच्या मृत्यूनंतर तुमची सोबत करीत नाही, ज्या शरीराचे तुम्ही जन्मभर कोडकौतुक करता, त्याला खाऊपिऊ घालता, वस्त्रालंकारांनी सजवता त्या तुमच्या शरीराची अखेर मातीच होते की अग्नीत भस्मसात केले जाते.

शेवटी तुमच्यासोबत तुमचा धर्म येतो. तेंव्हा ना केंव्हा तरी, आज ना उद्या, प्रत्येकाला इहलोक सोडून जावे लागते.

**(क्रमश:)**

**– काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

## ऐतिहासिक कामगिरी



भारतीय पुरुषांचा क्रिकेट संघ ऑस्ट्रेलियात टी २० विश्वचषक खेळण्यासाठी रवाना झाला आहे. संपूर्ण देशाचे आणि मीडियाचे लक्ष त्या संघाकडे लागले असतानाच भारतीय महिला क्रिकेटचा संघ श्रीलंकेत आशिया चषक खेळतोय हे माहीत असणाऱ्या लोकांची संख्या खूप कमी आहे आणि ते साहजिकच आहे. कारण आपल्या देशात पुरुषांच्या क्रिकेट संघावर जीव ओवाळून टाकणारे जितके लोक आहेत, त्याच्या दहा टक्के लोक महिला क्रिकेट पाहत नाही. महिला क्रिकेटला भारतात कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात, त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही. महिला क्रिकेट संघाला प्रयोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात.

जनमानस

आता हेच पहा ना! पुरुषांची आशिया चषक स्पर्धा चालू असताना भारत या स्पर्धेत कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, श्रीलंकेत माहिलांचा आशिया चषक चालू होता हे किती लोकांना माहीत होते? याच आशिया चषक स्पर्धेत भारतीय महिलांनी अजिंक्यपद मिळवून आशिया चषकावर आपली मक्तेदारी सिद्ध केली. श्रीलंकेतील सिलहट येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी यजमान श्रीलंकन संघाचा धुव्वा उडवत आशिया चषकावर भारताचे नाव कोरले. अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी जबरदस्त गोलंदाजी करून श्रीलंकेला अवघ्या ६५ धावत गुंडाळून अवघ्या ८ षटकात ७१ धावा काढून एकतर्फी विजय मिळवला. अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी एकहाती वर्चस्व गाजवले. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय महिलांनी हुकूमत गाजवून श्रीलंकन महिलांच्या दाती तृण आणले. हा सामना जिंकून भारताने सातव्यांदा आशिया चषकावर नाव कोरले. सात वेळ आशिया चषक जिंकून भारतीय महिलांनी इतिहास घडवला आहे. जितकी लोकप्रियता पुरुषांच्या क्रिकेटला मिळते तितकी महिला क्रिकेटला मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. सलग सातव्यांदा आशिया चषकावर भारताचे नाव कोरून इतिहास घडवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाचे मनापासून अभिनंदन!

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

---

**दोन विचारधारांचा पुन्हा संगम होत आहे. तो हळूहळू व विचारपूर्वक व्हावा! तो आश्वासक असावा व सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रतिक्रांतीच्या सर्व शक्यता नष्ट करणारा असावा!!**

ब्राह्मणांनी पापक्षालन केले पाहिजे असे मोहन भागवत यांनी अलीकडे म्हटलेले आहे. भेदभाव नष्ट झाला पाहिजे असेही म्हटलेले आहे. त्यावर पापक्षालनाचा विचार कृतीत आणावा, असे आवाहन डॉ. आंबेडकर यांनी केलेले आहे. भारतीय समाजाच्या भवितव्याच्या दृष्टीने हे शुभ संकेत आपण मानले पाहिजेत. आजवर ब्राह्मणवादी वर्ग हा विषमतावादी वर्ग मानला गेलेला आहे. इतिहासकाळापासून अनेक विश्वासघातकी कारवाया या विचारधारेमुळे घडून आल्याचा आरोप अनेक अभ्यासक व तत्त्वचिंतकांनी केलेला आहे. अशा स्थितीत ब्राह्मणवर्ग जर खरोखरच समता, बंधुता व न्यायवादी मार्गावरून चालणार असेल, तर ते जितके उत्साहवर्धक, तितकेच चिंताजनकही ठरणार आहे. आजवरच्या पिढ्यांतील काही लोकांनी ठेवलेल्या उक्ती आणि कृतीतील अंतराचा हा परिणाम आहे. तत्कालीन फायद्यासाठी या वर्गातील काही लोकांनी केलेल्या काही अयोग्य कृती व घेतलेल्या अयोग्य भूमिका यांचा तत्कालीन लाभ त्यांना मिळाला असला, तरी त्यांच्या विश्वासार्हतेवर फार मोठे प्रश्नचिन्ह लागलेले आहे व ते सध्याच्या आणि पुढील पिढ्यांनाही भोवण्याची मोठी शक्यता आहे. त्यामुळे या वर्गातील प्रामाणिक लोकांनीच या वर्गातील अप्रामाणिक लोकांचा बंदोबस्त करण्याची गरज आहे. तसे झाले तर भारतासाठी पुढील काळ उज्ज्वल असेल.

**एके काळी बौद्ध विचारधारा व ब्राह्मणी विचारधारा यांचा संगम होऊन सध्याचा हिंदू धर्म निर्माण झाला; परंतु त्यातून समता हद्दपार झाली, अशा आशयाचे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेले आहेत. आता पुन्हा संगम झाला तर या संगमातून विषमता, वर्चस्ववाद, अंधश्रद्धा, जातीयता अशा सर्व नकारात्मक गोष्टी हद्दपार व्हाव्यात एवढीच अपेक्षा आहे.**

मोहन भागवत यांच्यासारख्या आजवर विषमतावादी मानल्या गेलेल्या विचारधारेतील महत्त्वपूर्ण व्यक्तीने सम्यक व समतावादी भूमिकांचे उच्चार करणे हे भारतातील समतावादी अहिंसक आंदोलनाचे यश आहे यात शंका नाही. शत्रूतेने शत्रूला वाढते हा बुद्ध विचार लक्षात ठेवून पुरोगामी समतावाद्यांनी आजवर जी काही सहनशीलता दाखवली, तिचेही हे फळ आहे. आता बराच उशीर झालेला असला तरी वेळ निघून जाण्याआधीच प्रतिगामी मानलेल्या गटांकडून संतुलित भूमिका घेतली जात आहे, हेही नसे थोडके! यातून काही आश्वासक कृती घडल्यास भारतीयांच्या पुढील पिढ्या सध्याच्या पिढीला धन्यवाद दिल्याशिवाय राहणार नाहीत.

एके काळी बौद्ध विचारधारा व ब्राह्मणी विचारधारा यांचा संगम होऊन सध्याचा हिंदू धर्म निर्माण झाला; परंतु त्यातून समता हद्दपार झाली, अशा आशयाचे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेले आहेत. आता पुन्हा संगम झाला तर या संगमातून विषमता, वर्चस्ववाद, अंधश्रद्धा, जातीयता अशा सर्व नकारात्मक गोष्टी हद्दपार व्हाव्यात एवढीच अपेक्षा आहे.

**- डॉ. रविनंद होवाळ,**
**संस्थापक, भारतीय बंधुता संघ.**

***

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# शोध मोहिमेनंतर ४० तासांनी सापडला मृतदेह

## ▪ मुस्ती परिसरातील हरणा नदीतील दुर्घटना; कुटुंबियांच्या आक्रोशाने परिसर गहिवरला

सुराज्य/अक्कलकोट

तुळजापूर तालुक्यात झालेल्या परतीच्या मुसळधार पावसाने हरणा नदीला महापूर आला आहे. या पुराच्या पाण्यात मुस्ती (ता. दक्षिण सोलापूर) येथील शेतकरी शुक्रवारी रात्री आठच्या सुमारास वाहून गेला. ग्रामस्थ, नातेवाईकांच्या अथक शोध मोहिमेनंतर तब्बल ४० तासांनी रविवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास मुस्तीपासून दीड किलोमीटर अंतरावर हरणा नदीच्याच पात्रातील काटेरी झुडपाला अडकलेल्या अवस्थेत मृतदेह सापडला. शिवानंद शरणप्पा वाले ( वय ५६)असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

मृतदेह हाती लागताच नदी काठावर जमलेले कुटुंबीय व नातेवाईकांनी हंबरडा फोडला. त्यांच्या आक्रोशाने हरणा नदी काठासह मुस्ती परिसर अक्षरश: गहिवरला.

हरणा नदीला पूर आल्यानंतर मुस्ती परिसरातील नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. आत्तापर्यंत या पुराने दुसरा बळी घेतला आहे. शेतकरी वाहून गेल्यानंतर त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, ग्रामस्थ, तरुणाने नदीपात्रात ट्यूबवर बसून शनिवारी दिवसभर शोध घेतला. पण त्यांचा तपास लागला नाही. रविवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास नागराज मोरडे यांच्या शेताजवळ काटेरी झुडपाला मृतदेह अडकल्याचे एका युवकाला आढळून आले.तत्काळ त्यांनी ही माहिती ग्रामस्थांना दिली. मयत शिवानंद वाले यांना पाण्यातून शोधून बाहेर काढण्यासाठी सरपंच नागराज पाटील, गावकरी सुनील कारभारी, राजेंद्र हरे, ओंकार कुर्ले,पप्पू दबडे,प्रणव वाले, अभिजित वाले, शेखर दबडे,तोरकडे, करपे आदींचे सहकार्य



लाभले. सायंकाळच्या सुमारास शवविच्छेदन करून रात्री उशिरा मुस्ती येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### ▪ आपत्कालीन पथक, नायब तहसीलदार घटनास्थळी दाखल

दुर्घटनेची माहिती मिळताच आपत्कालीन पथक घटनास्थळी दाखल होऊन मृतदेहाचा शोध घेण्यासाठी प्रयत्न करण्याच्या तयारीत असताना काटेरी झुडपाला अडकलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. निवासी नायब तहसीलदारही घटनास्थळी दाखल होऊन ग्रामस्थांच्या अडचणी समजावून घेतल्या. सरपंच नागराज पाटील व ग्रामस्थांनी मयत वाले वारसदारांना आर्थिक मदत मिळण्याबाबत व पूल बांधण्याच्या संदर्भात त्यांना निवेदन दिले.

### ▪ आनंदनगरची वाट बिकट

मुस्ती गावाजवळून हरणा नदी वाहते. नदीच्या पलीकडे आनंदनगर (बेघरवस्ती) हा दोन हजार लोकवस्तीचा भाग आहे. नदीला पाणी आल्यानंतर पलीकडे जाताना ग्रामस्थांना संकटाला तोंड द्यावे लागते.

### ▪ हरणा नदीवर पुलाच्या बांधकामासाठी पाठपुरावा सुरू

दोन वर्षांपूर्वी आलेल्या महापुरात सखाराम गायकवाड हे वाहून गेल्याने त्यांचा मृत्यू झाला होता. अनेक जण पाण्यात वाहून गेले. अनेक जण सुदैवाने वाचलेही आहेत. तीन-चार महिन्यातील ही दुसरी घटना घडली आहे. त्यामुळे बेघर वस्तीला जोडणाऱ्या या रस्त्यावर पूल बांधण्याची मागणी जोर धरत आहे. यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहे, असे सरपंच नागराज पाटील यांनी सांगितले.

शिवानंद शरणप्पा वाले हे शेतातील काम आटोपल्यानंतर शुक्रवारी रात्री घरी येत होते. रात्रीच्या काळोख्या अंधारात नदीपात्रातील पाण्याचा अंदाज त्यांना आला नाही. यामुळे ते वाहून गेल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. १७ जुलै रोजी झालेल्या पावसात नदीला मोठा पूर आला होता. या पुरात शौकत रशीद नदाफ (वय ३८, रा. आनंदनगर, बेघरवस्ती, मुस्ती) याचा नदीत वाहून गेल्याने मृत्यू झाला होता. शौकत हा मुस्ती गावातील एका हॉटेलमध्ये काम करून आपले घर चालवत होता. नेहमीप्रमाणे हॉटेलमधील काम संपवून रात्री तो बेघर वस्तीवरील आपल्या घरी निघाला होता. हरणा नदीतून जाताना पाण्याचा प्रवाह वाढल्याने तो वाहून गेला.

त्याचा मृतदेह तिसऱ्या दिवशी सापडला. त्यानंतर अशा दुर्घटना घडू नये म्हणून मुस्ती ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले होते. अनेक वर्षापासून हरणा नदीवर पूल बांधण्याची मागणी करुनसुध्दा प्रशासनाने गांभीर्याने घेतले नव्हते. या युवकाच्या मृत्यूनंतर प्रशासन हलले. त्यानंतर मुस्ती-अरळीदरम्यान पूल बांधण्याचा प्रस्ताव बांधकाम विभागाने पाठविला आहे.



## कुचन प्रशालेत डॉ.ए.पी.जे.कलाम जयंती साजरी

**सोलापूर** : माजी दिवंगत राष्ट्रपती मिसाईलचे जनक आणि महान शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. कलाम यांच्या जयंती निमित्त पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण संकुलात कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य युवराज मेटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम, पर्यवेक्षक जाहेदा जमादार, दत्तात्रय मेरगू, मल्लिकार्जुन जोकारे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. कलाम यांच्या जयंती निमित्त प्रशालेत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला व वाचू आनंदे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रशालेच्या ग्रंथालयातील वाचनीय पुस्तके ग्रंथपाल अंबादास गाजूल यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना सुट्टीत वाचनासाठी देण्यात आली. प्राचार्य युवराज मेटे यांनी डॉ. कलाम यांच्याबद्दल सविस्तर माहिती सांगून विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात अवांतर वाचन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन सांस्कृतिक प्रमुख मलिक पठाण यांनी केले. कार्यक्रमास प्रशालेतील शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



## देवकते प्रशालेत डॉ.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

**सोलापूर** : आनंदराव देवकते प्रशाला वडजी ता.द. सोलापुर येथे राष्ट्रपती भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त प्रशालेत त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले. जागतिक प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यानी वेगवेगळ्या पुस्तकांचे वाचन केले. तसेच जागतिक हात धुवा दिनानिमित्त विदयार्थाना स्वच्छताचे महत्त्व सांगुन प्रात्यक्षिक करुन घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याण गजबार होते. कार्यक्रमास शाळा विभाग प्रमुख श्रीमंत हक्के, सुरेन्द्र कांबळे, आनंद भिमन्नवरू,आश्वीनी निचळ, संध्याराणी चिवरे, सचिन क्षिरसागर हे उपस्थित होते. प्रसंगी मुख्याध्यापक कल्याण गजबार यांनी जयंती जिमित्त व स्वच्छतेचे तसेचे प्रेरणा दिनाचे महत्त्व विद्यार्थ्याना पटवुन दिले.विध्यार्थानी आपली मनोगते व्यक्त केली. शेवटी आभार आनंद भिमन्नवरु यांनी मानले.

## छावा संघटनेच्या जिल्हासंघटक पदी शेळके



**सोलापूर** : अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेच्या जिल्हासंघटक म्हणून प्रदीप रामचंद्र शेळके यांची नियुक्ती जिल्हाध्यक्ष संजय पवार यांनी प्रदेश महा संपर्क प्रमुख प्रतापसिंह कांचन पाटील यांच्या आदेशाने केली आहे. शेळके यांनी संघटनेत समाधानकार काम केल्यामुळे ही निवड करण्यात आली आहे. संघटनेचा कार्य वाढीसाठी काम करणार असल्याचे शेळके यांनी यावेळी सांगितले.

## मुळेगाव येथे १२०० लिटर हातभट्टी आणि वाहन जप्त

**सोलापूर** : राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने १५ ऑक्टोबरच्या रात्री मुळेगाव तांड्याजवळ एका बोलेरो मोटारीतून १२०० लिटर हातभट्टी दारू जप्त केली.या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली. तर त्याचा साथीदार पसार झाला. निरीक्षक सदानंद मस्करे आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## राचोटेप्पा पाटील यांचे निधन



**दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर येथील राचोटेप्पा गुरुपादप्पा पाटील (वय -७२)यांचे निधन झाले.उद्या रविवार दि.१६ रोजी सकाळी ११.०० वाजता हत्तूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.त्यांच्या पश्यात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे.ते हरिहर संप्रदायाचे वारकरी होते.

## वेळापूर येथे १० कोंबड्या चोरल्या; एकावर गुन्हा

**वेळापूर** : वेळापूर (ता.माळशिरस) येथील डोंबार गल्लीतील एका बंद चिकन शॉपचे शटर उचकटून चोरट्याने १० जिवंत कोंबड्या पळविल्या. ही चोरी मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली.

या प्रकरणात वेळापूरच्या पोलिसांनी सोमा काळे (रा. वेळापूर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. यासंदर्भात केजीएन चिकन शॉपचे अल्ताफ तांबोळी यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. हवालदार दिवटे पुढील तपास करीत आहेत.

# घंटागाडी कामगाराच्या मृत्यूस आमची कंपनी जबाबदार नाही

## ▪ राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेचा दावा

सुराज्य/सोलापूर

महानगरपालिकेच्या घंटागाडी कामगाराचे हृदय विकाराने निधन झाल्याचे वृत्त प्रसारीत झाले होते. त्यामध्ये कामगाराच्या पत्नीने अधिक तास काम केल्याने मृत्यू झाल्याचा म्हटले आहे.

याबाबतचा खुलासा पालिका प्रशासनाकडे केला आहे. यामध्ये काही तथ्य नाही त्या कामगाराच्या मृत्यूस आमची राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था जबाबदार नाही असा दावा कंपनीचे आदेश नवले यांनी केला आहे. सदरचा कामगार हा ३ ऑक्टोबर रोजी त्याचे काम संपवून कामाच्या ठिकाणावरून ३.५५ वाजता कामावरून गेला आहे. ३ वाजता त्याने त्याच्या गाडीचे काम संपवून गाडी झोन यार्डवर जमा केले असल्याची नोंद आमच्या कडील रेकॉर्डमध्ये नमुद आहे. तरी सदरील कामगार हा ४ ऑक्टोबर रोजी पहाटे ५.३० मिनिटाने सकाळी हृदय विकाराच्या झटक्याने त्याच्या राहत्या घरी मृत्यु झाला आहे. तसे वैद्यकीय प्रमाणपत्रावरून सिध्द होत आहे. मग या कामगाराच्या मृत्यूस



आमची कंपनी कशी जबाबदार आहे. या कामगाराच्या मृत्यू नंतर ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता बापुसाहेब सदाफुले नामक व्यक्तींचा आपल्यास फोन आला. सदर कामगाराच्या मृत्यु बद्दल आपण जबाबदार आहात असे म्हणत त्या परिवाराला काही आर्थिक मदत कराची लागेल नाहीतर मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी धमकी वजा इशारा देत गुन्हादाखल करण्याचा इशारा दिला.

आपल्या कामगाराचा मृत्यू झाल्याने माणूसकीच्या नात्याने अत्यविधीसाठी दहा हजार तात्काळ संबंधीत मृत व्यक्तीच्या पत्नीकडे आम्ही पाठविले मात्र बापुसाहेब सदाफुलेंनी ती रक्कम मयत व्यक्तीच्या पत्नीस घेऊ दिली नाही. त्यानंतर दुपारी १२ वाजता सदाफले यांचा माला परत फोन आला त्यानी दहा हजारात काय होते कमीत कमी ५० हजार द्या असे सांगितले याबाबत आपण कोण अशी विचारणा करत तो आमचा कामगार आहे शक्य ती मदत केली आहे. असे सांगितले आणि महानगरपालिकेच्या अटी व शर्ती प्रमाणे ज्या रुट वरती जे काम संबंधीत वाहनचालक व बिगाऱ्यांना दिले असते ते त्यांनी ३ वाजेच्या आत पूर्ण करणे गरजेचे असते. असे संबंधीत कामगारांना माहित असते. त्यामुळे आम्ही कोणतेही अतिरिक्त काम कामगारांना देत नाही.

मात्र सदाफुले नामक व्यक्ती आमच्या संस्थेचे नाव व आमचे नाव नाहक खराब करित बदनाक करत आहे त्यामुळे हा खुलास असल्याचे राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या वतीने म्हटले आहे.

# छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेडचे काम एकतेसाठी आदर्शवत : पोलीस आयुक्त डॉ.माने

सुराज्य/सोलापूर

छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्या वतीने आयोजित ईद ए मिलादुन्नबी निमित्ताने प्रार्थना स्थळे सजावट, नआत स्पर्धेचे विजेत्यांना पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी पोलिस आयुक्त डॉ राजेंद्र माने होते. शहरात बंधुभाव, एकता आणि सौदार्य निर्माण करण्यासाठी छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड सदैव कार्यरत आहे.

विविध उपक्रम, कार्यक्रम आयोजित करुन मानव





जोडण्याचा प्रयत्न केले जात आहे. आपण सारे एक आहोत, एकत्र राहण्यातच आपल्या देशाच हित आहे. आज विविध धार्मिक प्रमुखांना एका विचारपीठावर स्नेहपुर्वक आणून आम्ही सारे एक आहोत हे आदर्शवत काम ब्रिगेड करत आहे. आमच्या पोलिस खात्याच काम हलके झाले आहे याच कौतुक आहे. असं मत पोलिस आयुक्त डॉ राजेंद्र माने साहेब यांनी व्यक्त केले. या प्रसंगी मौलाना जबीऊल्ला, सिध्देश्वर मंदिराचे मुख्य पुजारी राजशेखर हिरेहब्बू, गुरुनानक दरबारचे ग्यानी रमेश सिंघ, मराठा सेवा संघाचे संजय जाधव, राम गायकवाड, मिलींदनगर बुध्दविहारचे अण्णासाहेब वाघमारे यांच्यासह हाजी मुन्नाफ चौधरी, संजय सुरेश शिंदे, अमोल बापू शिंदे, श्रीदेवी फुलारी, आनंद चंदनशिवे, शिरअली शेख, श्रीकांत डांगे, जुबेर बागवान आदी उपस्थित होते.

# शेतजमिनीची परस्पर विक्री; ३ महिलांसह चौघांवर गुन्हा

**मोहोळ** : न्यायालयाचा निकालाची दिशाभूल करून दुसऱ्याच्या नावावरील शेतजमीन परस्पर विकून फसवणूक केल्याची घटना शेटफळ (ता.मोहोळ) येथे नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात मोहोळच्या पोलिसांनी तिघा महिलासह चौघाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

या संदर्भात दत्तात्रय तुकाराम पुजारी (रा. शेटफळ) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी संतोष रामचंद्र डंके, वैजयंता रामचंद्र डंके (रा.अरुणबाग, पुणे), विद्या विजयकुमार देशमुख(रा.मुंबई) आणि मानसी संजय कुलकर्णी (रा. बारामती,पुणे) अशा चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शेटफळ येथील गट क्रमांक ३१९ मधील शेतीचा वाद दिवाणी न्यायालयात चालू होता. त्या जमिनीचा निकाल १९९० साली भास्कर रामचंद्र डंके यांच्या बाजूने लागला होता. हे माहीत असताना देखील वरील चौघांनी मे२०११ ते जुलै २०22 या कालावधीत ती शेतजमीन परस्पर आम्हाला खुश खरेदीने विकून फसवणूक केली. असे पुजारी यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार आदलिंगे करीत आहेत.

# साखर कारखानदारी कोण वाचवणार असेल तर इथेनॉल धोरणच वाचणार : विखे-पाटील

## पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या ३२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ

सुराज्य/श्रीपूर

साखर कारखानदारी कोणी वाचवणार असेल तर इथेनॉल धोरणच वाचवणार आहे बदलत्या अर्थकारणामध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इथेनॉलच्या धोरण आणले आहे. पण विरोधक मात्र २० वर्ष इथेनॉल निॅमीती करणार म्हणून भांडत होते त्यांनी काहीच केले नाही, मात्र नरेंद्र मोदी इथेनॉल निर्मितीचे धोरण अवलंबून राम नाईक यांच्या काळात पाच टक्के इथेनॉल मिसळण्याचा निर्णय घेतला त्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विशेष पुढाकार घेऊन त्यांच्या काळात इथेनॉल दहा टक्के मिसळण्याचा निर्णय घेण्यात आला आणि आत्ता २०७ इथेनॉल मिक्स करण्याचे धोरण अवलंबले जात आहे.

त्यामुळे साखर कारखानदारीला ऊर्जा मिळाली, असे प्रतिपादन महसूल पशुसंवर्धन व दुग्ध विकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले ते श्रीपूर येथील श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या ३२ व्या गळीत हंगामाच्या शुभारंभ व अरवानी प्रकल्प विस्तारीकरण उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माढा खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील, मा.आ. कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक, व्हाईस चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील, युटोपियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक, माजी चेअरमन दिनकरभाऊ मोरे ,वसंतराव देशमुख, शिवानंद पाटील, अप्पर जिल्हाधिकारी संजय कुमार जाधव, पांडुरंग कारखान्याचे सर्व संचालक व मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या आसवनी प्रकल्प विस्तरीकरणाचे उद्घाटन व ३२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ मोळी टाकून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माढा खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, आमदार



रणजितसिंह मोहिते पाटील, कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक, उमेश परिचारक यांच्या हस्ते करण्यात आला. सुरुवातीला कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले. तसेच कार्यक्रमाला व्यासपीठावर उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचा पांडुरंग कारखान्याचे वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की कै. सुधाकरपंत परिचारक व माझा जुना स्नेह होता, मी परिवहन मंत्री असताना ते एसटी महामंडळाचे अध्यक्ष होते त्यामुळे नेहमीच कै. सुधाकरपंत परिचारक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या सहकारी साखर कारखानदाराच्या वाटचालीमध्ये अनेकवेळा राज्य साखर संघाच्या सभेमध्ये किंबहुना सहकारी साखर कारखानदारी कशी टिकली पाहिजे यासाठी अतिशय ध्यास घेऊन त्यांनी आयुष्यभर सहकारी चळवळीमध्ये, कारखानदारीमध्ये त्यांनी काम केले, त्यामुळे खाजगी कारखान्याच्या विरोधात आयुष्यभर आमची लढाई राहिली. कै. सुधाकरपंत परिचारक मार्गदर्शन करणारे नेतृत्व होते यांच्याकडे जाऊन बसावे त्यांचे विचार ऐकावेत असे सांगून ते पुढे म्हणाले की मला वाटते त्यांचाच तो विचार होता की हा जो खाजगी कारखाना आहे तो सहकारी होऊन ३२ वर्षे झाली आज या पांडुरंग कारखान्याने राज्यासमोर नवा आदर्श निर्माण केला हे मोठे योगदान आहे असे सांगितले ते पुढे म्हणाले की गेली पंधरा वर्षे सहकारी साखर कारखाने आजारी पडले की लोक विकत घ्यायला तयार होते, राज्यात एक टोळी तयार झाली होती ५० कोटी रुपयांचे कारखाने २० कोटी रुपयात विकले गेले सहकारातला अर्थ आम्ही संपवण्याचे काम केले. आज खाजगी कारखानदारीही उत्तम अशी चालते, परंतु बंद पडलेले सहकारी साखर कारखानदारी त्यांना ऊर्जा अवस्थेत आणण्यासाठी राज्य सरकार म्हणून मदत करायला पाहिजे होती त्यांना आधार द्यायला पाहिजे होता तो मागच्या १५ ते २० वर्षांत कुठे गेला या कारखान्यांना मदत झाली नाही असे सांगून ते पुढे म्हणाले की मोठ्या कष्टातून सहकार चळवळ उभी राहिली आहे आज आपल्या पांडुरंग कारखान्याचे उदाहरण घेतले तर पांडुरंग मध्ये सभासदांना उत्तम असा दर दिला जातो, कारखान्याचे निकष पाहिले तर देशातील खाजगी कारखान्यांना लाजवेल असा उत्तम कारभार या कारखान्याचा आहे असे यावेळी आवर्जून सांगितले. आमदार रणजितसिंह मोहिते म्हणाले की, डिस्टिलरींना शासनाकडून घेण्यात येत असलेल्या पाण्यावर जलसंपदा प्राधिकरणाने नवीन नियम घालून दिले आहेत पूर्वी एक हजार लिटरला २२ रुपये दर दिला जायचा. आता डिस्टलरीला एक हजार लिटरला ३३०रुपये दर लागू झाला आहे. शासनाने यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केल आहे.आभार कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलास खुळे यांनी मानले.

# सोलापुरात वारकरी भवन उभारणारच : इंगळे महाराज



✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी वारकऱ्यांच्या सोयीसाठी आधुनिक पद्धतीचे वारकरी भवन बांधायचे आहे यासाठी माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांनी जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून दीड कोटी रुपयांची तरतूद करून ठेवली होती त्या तरतुदीप्रमाणे येत्या काही दिवसातच वारकरी भवन उभारले जाईल, असे मत अखिल भाविक वारकरी मंडळाचे अध्यक्ष हभप सुधाकर इंगळे महाराज यांनी व्यक्त केले.**

अखिल भाविक वारकरी मंडळाच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त फडकुले सभागृह येथे आयोजित राज्यस्तरीय मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठल मूर्तीचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. या मेळाव्यास शहर उत्तरचे आ. विजयकुमार देशमुख, अखिल भाविक वारकरी मंडळाचे उपाध्यक्ष हभप भागवत चवरे, कंदरचे सरपंच हभप भास्कर भांगे, विनोद सरवदे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, उद्योजक दत्ताअण्णा सुरवसे, हभप ज्ञानेश्वर चव्हाण, अशोक काळे, बाळासाहेब हारदाडे, प्रमोद मसुलकर, धाराशीव, सांगली, परभणी, सोलापूर जिल्हाध्यक्ष मनोगत व्यक्त केले.

या मेळाव्यात वारकरी संप्रदायाची निष्काम सेवा व विशेष योगदान देणाऱ्या ज्ञानेश्वर अवताडे, शंकर भोसले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रमुख किरण श्रीचिप्पा व संत तुकाराम महाराज पालखी प्रमुख श्रीकांत ढगे यांचाही सन्मान करण्यात आला. या मेळाव्यासाठी उद्योजक दत्ताअण्णा सुरवसे यांनी वारकऱ्यांसाठी ३०० शाली भेट दिल्या होत्या तर कार्तिकी वारीसाठी निघणाऱ्या वारकऱ्यांसाठी दोन हजार शाली व एक हजार साड्या देण्याचे सुरवसे यांनी जाहीर केले.

यावेळी माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख म्हणाले की, 'आज या मेळाव्यात येऊन वारकऱ्याचे दर्शन घेतल्यामुळे आपल्याला इथेच पांडुरंग भेटला आहे. वारकऱ्यांची सेवा करण्यात जे पुण्य आहे ते पुण्य कशातच नाही. वारकरी भवन साठी आपण स्वतः प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. सूत्रसंचालन संजय पाटील यांनी केले तर उपस्थित वारकऱ्यांचे आभार जोतिबा चांगभले यांनी मानले.

हा मेळावा यशस्वी करण्यासाठी बळीराम जांभळे, बंडोपंत कुलकर्णी, मोहन शेळके, संजय पवार, किसन कापसे, किरण श्रीचिप्पा, विष्णुपंत लिंबोळे, निवृत्ती मोरे कुमार गायकवाड, अभिमन्यू डोंगरे, नागनाथ पाटील, हरिहर मोरे, सचिन गायकवाड, गोविंद लोंढे, दत्तात्रेय सरवदे, नागनाथ शिंदे, गणेश वारे, महेश चोरमुले, दत्तात्रय भोसले, ज्ञानेश्वर भगरे, नवनाथ मोरे आदींनी परिश्रम घेतले.



## सोलापूर विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन

✔ सुराज्य/सोलापूर : अभ्यासक्रमाबरोबरच विविध साहित्य, संस्कृती, थोर व्यक्तींच्या आत्मकथा, कादंबरी, दुर्मीळ ग्रंथ, दिवाळी अंक यासंदर्भात व्यापक पद्धतीने वाचनाची गोडी विद्यार्थ्यांना लागावी आणि वाचन संस्कृती वाढावी, या उद्देशाने विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या प्रदर्शनाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. राजेश गादेवार यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव योगिनी घारे, वित्त व लेखाधिकारी सीए श्रेणिक शाह, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपूर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. गौतम कांबळे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. या ग्रंथ प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांना ६० हजार विविध पुस्तके, १६० जर्नल्स, त्याचबरोबर ४५७ ई बुक आणि ५० हजारहून अधिक ई-जर्नल्स विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध असणार आहेत. येत्या ३० ऑक्टोबरपर्यंत हे ग्रंथ प्रदर्शन चालू असणार असल्याचे संचालक डॉ. गौतम कांबळे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानाबरोबरच इतर ज्ञान ग्रहण करण्यासाठी अवांतर वाचन करून जीवन समृद्ध बनण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन यावेळी प्र-कुलगुरू डॉ. राजेश गादेवार यांनी केले.

# नर्सिंग अभ्यासक्रमांचा महाडीबीटी प्रणालीवर समावेश करावा

### ▶ धैर्यशील मोहिते-पाटील यांची निवेदनाद्वारे मागणी

✔ सुराज्य/अकलूज

**राज्याचे महसूल तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील श्रीपूर येथील कार्यक्रमानिमित्त आले असता अकलूज येथे मोहिते-पाटील यांच्या शिवरत्न या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता यावेळी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या सूचनेनुसार धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी ए.एन.एम. व जी.एन.एम या नर्सिंग अभ्यासक्रमांचा महाडीबीटी प्रणालीवर समावेश करावा म्हणून महसूल मंत्री विखे-पाटील यांच्याकडे विनंती केली.**

दि. १ जुलै २०११ च्या केंद्र सरकारच्या पत्रान्वये परिशिष्ट (ब) मध्ये नमूद नर्सिंग पदविका अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आलेला आहे. पण अद्याप राज्य शासनाने ए.एन.एम व जी.एन.एम या पदविका अभ्यासक्रमांना महाडीबीटी प्रणालीवर समावेश करण्यासाठी मान्यता दिली नाही. त्यामुळे वि.जा.भ.ज.इ.मा.व. व वि.मा.प्र. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार शिष्यवृत्ती च्या योजनेचा लाभ घेता येत नाही व त्यामुळे नर्सिंग अभ्यासक्रमापासून या प्रवर्गातील विद्यार्थी वंचित राहत आहेत.

महाराष्ट्रातील या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थांना देखील केंद्र शासनाच्या योजनेचा लाभ मिळावा म्हणून राज्य शासनाने कार्यवाही करावी अशी विनंती मोहिते-पाटील यानी केली असता मंत्री विखे-पाटील यांनी इतर कोणत्या कोणत्या राज्यात अशा प्रकारची शिष्यवृत्ती दिली जाते, याची माहिती सादर करा, त्याप्रमाणे आपण आपल्या राज्यात ही शिष्यवृत्ती लागू करण्यासाठी योग्य तो निर्णय घेऊ असे सांगितले.

राज्य शासनाने भारत सरकार शिष्यवृत्ती योजना अनुसूचित जाती व जमाती (SC व ST) या प्रवर्गास लागू करण्यात आली आहे. विधानसभेत दिलेल्या आश्वासनाप्रमाणे त्वरित निर्णय घेण्यात यावा जेणेकरून सन २०२०-२१ मध्ये नर्सिंगला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल. यासाठी या नर्सिंग पदविका अभ्यासक्रमांचा दि. ४ जून २०१९ च्या शासन निर्णयामध्ये मान्यता देऊन यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावा अशी विनंती केली.



## नान्नज जि. प. शाळेत मिळणार शुद्ध पाणी

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर : उत्तर तालुक्यातील नान्नज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस गावचे सुपुत्र जेजे समूह रुग्णालयातील समाजसेवा विभाग प्रमुख दत्तात्रय विभूते यांच्या प्रयत्नातून जीवन ज्योत कॅन्सर केअर ट्रस्ट मुंबई यांच्यावतीने नान्नज जि. प शाळेत 'आरो वॉटर फिल्टर' भेट देण्यात आले. जे. जे. रुग्णालयातील समाजसेवा विभाग प्रमुख दत्तात्रय विभूते, सोलापूर जि.प कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा अधिकारी सुनिल कटकदौंड, सरपंच राणी टोणपे, ग्रामसेवक गंगाधर कांबळे यांच्या प्रमुख उपस्थित शुभारंभ करण्यात आला.

माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती, जागतिक हात धुवा दिनही साजरा करण्यात आला. यावेळी विभूते म्हणाले की, नान्नज जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत होत होती. विद्यार्थ्यांना आता यापुढे बसवण्यात आलेल्या रो. वाटर फिल्टरमधून पिण्याचे शुद्ध पाणी मिळणार आहे. जीवन ज्योत कॅन्सर केअर ट्रस्ट व मुख्य अधिकारी हरकचंद सावला यांच्यावतीने ३५ वर्षापासून कॅन्सर रुग्णांना मदत करत आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना रोज दोन वेळेचे भोजनही मोफत देण्यात येत आहे. यापुढेही गावातील गोरगरीब व गरजू नागरिकांना मदतीचा हात देणार असल्याचे यावेळी ते म्हणाले. विद्यार्थ्यांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटल्याने पालक, शिक्षक, ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे. यावेळी तात्यासाहेब कादे, नंदकुमार गवळी, प्रताप टेकाळे, किशोर पाटील, भारत गवळी, प्रवीण भालशंकर, संभाजी दडे, योगेश गवळी, विश्वजीत भोसले, भारत बोंगे, मंजूर शेख, जगन्नाथ भोरे, मुख्याध्यापक रामकृष्ण हेडाव, शिंदे, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.



## प्रेरणादायक चरित्रांच्या वाचनातून व्यक्तिमत्त्व घडते : डॉ. येळेगावकर

✔ सुराज्य/सोलापूर : सकस, दर्जेदार पुस्तकांच्या, थोर व्यक्तींच्या चरित्रांच्या, आत्मचरित्रांच्या वाचनातून संतसंगातून समतोल व्यक्तिमत्त्व घडते. सामाजिक जाणिवा प्रगल्भ होतात. राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव निर्माण होऊ शकते. आचार विचार शुद्ध होऊ शकतात. दर्जेदार साहित्याचे वाचन करावे. मग ते माध्यम ऑडिओ बुक, किंडल बुक, इन्स्टाग्राम असो. समाज माध्यमांचा विवेकबुद्धीने वापर करावा, असे आवाहन हिराचंद नेमचंद वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीच्या निमित्ताने ग्रंथप्रदर्शन व साहित्यिकांच्या छायाचित्रांच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी वाचनालयाचे कार्यवाह दत्ता गायकवाड, साहित्यिक नितीन वैद्य, ग्रंथपाल दत्ता मोरे विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते. यावेळी दत्ता गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. वाचनालयात डॉ. एपीजे कलाम यांनी लिहिलेली, त्यांच्यावर लिहिलेली इतर साहित्यिकांची, पुस्तके, छायाचित्रे ठेवण्यात आलेली आहेत. ग्रंथालयाच्या वेळेत हे प्रदर्शन नागरिकांना सकाळी व संध्याकाळी पाहता येईल.



## जागतिक कर्णबधिर दिनानिमित्त लायन्सतर्फे मोफत श्रवणयंत्र वाटप

✔ सुराज्य/अक्कलकोट

प्रत्येक मानवी अवयव हे अतिशय महत्त्वाचा आहे, आधुनिक यांत्रिक युगात साधनसुविधांचा योग्य वापर करून आपण सर्वसाधारण जीवन जगू शकतो, असे प्रतिपादन लायन्स क्लब अक्कलकोटचे अध्यक्ष ला. मल्लिकार्जुन मसुती यांनी लायन्स प्राथमिक शाळेत आयोजित कार्यक्रमात केले.

जागतिक कर्णबधिर दिनाचे औचित्य साधून दोघा गरजूंना लायन्स क्लब अक्कलकोटचे चार्टर मेंबर डॉ. अरुण परिचारक यांच्या तर्फे मोफत श्रवणयंत्र प्रदान करण्यात आले. समाजासाठी चांगले काम करत आहेत, त्यांच्या चांगल्या कामासाठी मी या प्रांताचा प्रांतपाल म्हणून नेहमीच आपल्या सोबत आहे असे प्रतिपादन ला. राजशेखर कापसे यांनी केले.

याप्रसंगी सचिव संतोष जिरोळे, खजिनदार सुनील बिरादार, ज्येष्ठ लायन प्रभाकर मजगे, मल्लिनाथ साखरे, सुभाष गडसिंग, शिवपुत्र हळगोदे, राजशेखर चनशेट्टी, राजशेखर हिप्परगी, सुभाष खमितकर, शिरीष पंडित, लायन्स ट्रस्ट अध्यक्ष राजेंद्र हत्ते, डॉ. विवेक करपे, शदिद वळसंगकर, शिवशरण खुबा, चेतन जाधव, डॉ. आसावरी पेडगावकर उपस्थित होते.सूत्रसंचालन सहशिक्षिका पटणे यांनी केले व संतोष जिरोळे यांनी आभार मानले.

## पद्मशाली चौकातून दुचाकी पळवली

✔ सुराज्य/सोलापूर : हॅण्डल लॉक तोडून व डुप्लिकेट चावीचा वापर करून अज्ञात चोरट्याने पार्किंगमध्ये लावलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३. सीएल.३८५९ ही साजिद अब्दुल शेख यांच्या नावावर



असलेली व फिर्यादी इम्रान नजीर अहमद दौलताबाद (वय-३०, रा. पद्मशाली चौक) हे वापरत होते.फिर्यादी यांनी वरील ठिकाणी मोटरसायकल हॅण्डल लॉक करून ठेवले असता अज्ञात चोरट्याने दुचाकीचे हॅण्डल लॉक तोडून व डुप्लिकेट चावीचा वापर करून चोरून नेली आहे, असे फिर्यादीत म्हटले आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल काझी हे करीत आहेत.

## हिराचंद वाचनालयात ऑडिओबुकचे प्रकाशन

✔ सुराज्य/सोलापूर : बदलत्या काळाप्रमाणे आपण ही बदललो, तरच आपण जगाबरोबर राहू शकतो. सोलापुरातील १६९ वर्षे जुन्या हिराचंद नेमचंद वाचनालयाने देखील वेळोवेळी स्वतः ला काळाबरोबर बदलत नेले. याचेच पुढचे पाऊल म्हणून, स्टोरीटेल इंडिया यांच्याबरोबर काम करायचे ठरवले आहे.

स्टोरीटेल इंडियाने जवळजवळ ११ भारतीय भाषांमधील पुस्तके ऑडिओ बुकच्या स्वरुपात उपलब्ध करून दिली आहेत. ही पुस्तके ख्यातनाम अभिनेते विक्रम गोखले, तुषार दळवी, मुक्ता बर्वे, संदीप खरे यांनी वाचली आहेत. वाचकांनी स्टोरीटेल इंडियाची वार्षिक वर्गणी भरली तर त्यांना हि. ने. वाचनालयाचे एक वर्षाचे सभासदत्व मोफत मिळणार आहे. म्हणजेच पुस्तके वाचनाबरोबरच ऐकण्याचाही आनंद मिळेल. या योजनेसाठी आणि स्टोरीटेल इंडियाच्या आणखी काही योजनांसाठी 'नदीष्ट' या पुस्तकाचे लेखक मनोज बोरगावकर यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम २० ऑक्टोबर २०२२ रोजी सायं. ६.०० वा. ॲम्फी थिएटरमध्ये आयोजित केला आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. तरी सर्व वाचनप्रेमींनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले आहे.



## तेजज्ञान फाउंडेशनतर्फे ग्रंथ भेट

✔ सुराज्य/सोलापूर : निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत वाचन प्रेरणा दिनानिमित्त तेजज्ञान फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना पंधराशे ग्रंथ भेट देण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. प्रशालेचे प्राचार्य विजयकुमार हुल्ले, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, तेजज्ञान फाउंडेशनचे पदाधिकारी डॉ. श्रुती मराठे, अंबादास कस्तुरी, अमरीश कोम्पेल्ली आदी उपस्थित होते. याप्रसंगी अण्णाराव कुंभार यांनी विविध ग्रंथांची अवांतर वाचन करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. श्रुती मराठे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी व आवड निर्माण व्हावी या उदात्त हेतूने ग्रंथ वाटप करण्यात आल्याचे सांगितल्या. यावेळी राजकुमार मरगुरे, क्रिडा प्रमुख विठ्ठल कुंभार, धर्मराज बळारी, लक्ष्मीकांत त्रिशुले, शिवानंद पुजारी यांच्यासह प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. दीपक नारोणे यांनी केले तर प्रा. अमर दुस्सा यांनी आभार मानले.

## हजरत पीर शाहशफिल कादरी (रहे.) यांचा मंगळवारपासून ऊरुस

✔ सुराज्य/सोलापूर : अक्कलकोट एसटी बसस्थानक परिसरातील हजरत शाहशफिल कादरी (रहे.) दर्गाहच्या १२४ व्या उरुसाला मंगळवारपासून प्रारंभ होत आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.



मंगळवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी भक्तांच्या उपस्थित संदल मिरवणूक सायंकाळी ५.३० वाजता दर्गाहपासून निघणार आहे. शहरातून फिरून परत दर्गाह येथे आल्यानंतर रात्री १० वा. संदलचा कार्यक्रम होईल. बुधवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी चिरागाचा कार्यक्रम होईल. गुरुवार, दि. २० ऑक्टोबर फातेहाखानी होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

सर्व हिंदू-मुस्लीम भाविकांनी उरुसात सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन दरगाहचे साहेब एम. शफी एम.हनिफ शेख व मुजावर दाऊद एम. हनीफ शिकलगार शाहशफिल यंग कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात सर्वत्र हात धुवा दिन साजरा

✔ सुराज्य/सोलापूर

**जागतिक हात धुवा दिनानिमित्त जिल्ह्यात सर्व पंचायत समिती, ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी, आरोग्यवर्धिनी केंद्र, उपकेंद्र व महिला बचत गटामध्ये स्वच्छ हात धुण्याचे प्रात्यक्षिक सादर करून स्वच्छ हातामध्ये प्रत्येकाचे आरोग्य आहे, याबद्दल मार्गदर्शनही करण्यात आले.**




दरवर्षी जागतिक हात धुवा दिनानिमित्त १५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक हात धुवा दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी सार्वत्रिक हात स्वच्छतेसाठी एकत्र येऊया या थीमनुसार या दिनाचे औचित्य साधून मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं./पा. व स्व.) इशाधीन शेळकंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सर्व पंचायत समिती, ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी व महिला बचत गटामध्ये हात धुवा दिनानिमित्त स्वच्छ धुण्याचे प्रात्यक्षिक, वैयक्तिक, सार्वजनिक स्वच्छता, स्वच्छ हात धुण्यामुळे आरोग्य सुदृढ बनण्यास होणारी मदत आदी विषयी उपक्रम घेण्यात आले. जिल्ह्यातील पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात आलेल्या सदर कार्यक्रमप्रसंगी, गटविकास अधिकारी, सरपंच, उपसरपंच, सदस्य, महिला व बालकल्याण विभाग तसेच आरोग्य केंद्रातील अधिकारी, कर्मचारी, शाळेतील शिक्षक, अंगणवाडी सेविका, जिल्हा कक्षातील सल्लागार, बी. आर. सी. व सी.आर.सी., ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

आपल्या हातावर असणारे असंख्य रोगजंतू आरोग्यासाठी बाधा ठरू शकतात. त्यामुळे हातांची स्वच्छता ही अनेक रोगांपासून बचाव करण्यात यशस्वी ठरलेली आहे. यास्तव हात स्वच्छ धुणे ही सवय अंगी बाणणे महत्त्वाचे आहे. जागतिक हात धुवा दिना निमित्त विविध उपक्रमाद्वारे हात स्वच्छ धुण्याचे महत्त्व व त्याचे आरोग्य विषयक फायदे याबद्दल जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली.

मंगळवेढा येथील संत दामाजी महाविद्यालयामध्ये ग्राम स्वराज्य अभियान कार्यक्रमामध्ये सरपंच व ग्रामसेवक यांनाही स्वच्छ हात धुण्याचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी गट विकास अधिकारी शिवाजीराव पाटील, प्राचार्य एन.बी.पवार, विद्या विकास मंडळाचे किसन गवळी, सोमलिंग संस्थेचे दत्तात्रय पाटील, जिल्हा कक्षचे संवाद सल्लागार सचिन सोनवणे, बी.आर. सी.धर्मराज संकनवरु, दयानंद सरवळे, एकनाथ जगताप आदी उपस्थित होते.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**भाडेतत्वावर वाहन मिळणे बाबत**

अउदा पॅक विभाग-३, सोलापूर येथे भाडेतत्वावर टाटा सुमो /महिंद्रा बोलेरो प्लस किंवा तत्सम वाहनाची आवश्यकता असुन आमची कार्यालयीन चौकशी क्र. ६३५ दि. १४/१०/२०२२ असुन इच्छुकांनी त्यांचे कोटेशन सिलबंद लिफाफ्यात दि. २५/१०/२०२२ संध्याकाळी ०५:३० वाजेपर्यंत सादर करावे. वरील निविदे बाबतची संपुर्ण माहिती www.mahatransco.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

दुरध्वनी क्र. ७४४७४४०८५४.

सही/-
कार्यकारी अभियंता,
पॅक विभाग-३, सोलापूर

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**निविदा**

अउदा पॅक विभाग-3, सोलापूर व चाचणी कक्ष बारामती येथे सफाई कामाची आवश्यकता असून आमची कार्यालयीन चौकशी क्र. ६३६ दि. १४-१०-२०२२ असून इच्छुकांनी त्यांचे निविदा सिलबंद लिफाफ्यात दि. २५-१०-२०२२ संध्याकाळी ५:३० वाजेपर्यंत सादर करावे. निविदा बाबतची संपुर्ण माहिती www.mahatransco.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

दुरध्वनी क्र. ७४४७४४०८५४.

सही/-
कार्यकारी अभियंता,
पॅक विभाग-३, सोलापूर

# लावणी नृत्यांगना सरलाताई नांदोरेकर यांना शासनाचा सांस्कृतिक लावणी कलावंत पुरस्कार

✔ सुराज्य/अकलूज

**लावणी नृत्यांगना व नृत्य प्रशिक्षक श्रीमती सरलाताई नांदोरेकर यांना महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत २०१९-२० या वर्षातील राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहिर झाला आहे. याबद्दल माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व जयंती समारंभ समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.**



नृत्याच्या माध्यमातून आयुष्यभर रंगदेवतेची सेवा केली, महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत पुरस्कार जाहिर झाल्याची बातमी ऐकून आयुष्याचे सार्थक झाल्याचे वाटतंय.मला पुरस्कार मिळवा याकरीता माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व जयंती समारंभ समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील व आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी शासनाकडे सिफारस केली होती त्यांना मी धन्यवाद देते.

**- सरलाताई नांदोरेकर**

वयाच्या दहाव्या वर्षी बाबासाहेब मिरजकर यांचे कडून कथक व भरतनाट्यम नृत्याचे धडे घेण्यास सुरुवात करुन वयाच्या १६ व्या वर्षी सरलाताई नांदोरेकर यांनी लावणी नृत्यास सुरुवात केली होती.लता-लंका नांदोरेकर संगीत पार्टीच्या माध्यमातून अनेक वर्ष उत्कृष्ट लावणी नृत्य केले.तर नृत्याचे प्रशिक्षण देत असताना त्यांनी लावणी बरोबरच इतर नृत्याचे प्रशिक्षण दिले. त्यांच्या प्रशिक्षणातुन सिने अभिनेत्री व लावणी सम्राज्ञी वैशाली जाधव, वैशाली नगरकर प्रमीला लोदगेकर,वैशाली वाफळेकर, नेहा लखनगावकर सारख्या नामवंत नृत्यागना घडविल्या. कोल्हापुरातील बाबासाहेब मिरजकर यांच्याकडे भरतनाट्यम व कथ्थकनृत्याचे प्रशिक्षण अवगत केलेल्या सरलाताईनीं परंपरेने चालत आलेल्या लावणी नृत्यात नाव लौकींक मिळवला त्यांनी दोन नाटकांमध्ये मुख्य भूमिका तर व जानकी या चित्रपटात छोटासा अभिनय केला आहे.अकलुजच्या लावणी स्पर्धत त्यांनी प्रशिक्षित केलेल्या पार्ट्यांचा प्रथम क्रमांक तसेच हॅट्रिक झाली होती संगीत पार्टीने विजेतपद मिळवले होते तर सहकार महर्षी जयंती समारंभ समीतीने सन २००६ चा लावणी कलावंत पुरस्कार देवुन गौरव केला होता.लावणी क्षेत्रातील मानाचा पठ्ठे बापुराव पुरस्काराने ही सरलाताईचा गौरव झाला आहे.

सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत मानाचा महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत दिला जणारा सन २०१९-२० या वर्षातील राज्य सांस्कृतिक लावणी कलावंत पुरस्कार सरलाताई नांदोरेकर यांना जहीर झाला आहे. दिवाळीनंतर राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सांस्कृतिक मंत्री व मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. सरलाताई नांदोरेकर यांना पुरस्कार जाहीर झाल्यानंतर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व जयंती समारंभ समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील तसेच जयंती समारंभ समितीचे सदश्य चंद्रकांत कुंभार, सुभाष दळवी यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.



## वृत्तपत्र दिनाचे औचित्य साधून मैंदर्गीचे वृत्तपत्र विक्रेता शिवचलप्पा चोळ्ळे यांचा सत्कार

✔ **अक्कलकोट** : भारत देशाचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम हे पत्रकार व वृत्तपत्र विक्रेता होते या निमित्त दर सालाबादाप्रमाणे यंदाही वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा करण्यात आले वृत्तपत्र दिनाचे औचित्य साधून मैंदर्गी येथील पत्रकार शरणपा चलगेरी व ज्येष्ठ पत्रकार नागेश भंगर्गी, शिवा भंगर्गी मैंदर्गी श्रीशैल सुरपुरे यांचे हस्ते मैंदर्गी वृत्तपत्र विक्रेता शिवचलप्पा चोळ्ळे यांना फेटा शाल हार तुरे घालून सत्कार करण्यात आले. याप्रसंगी मैंदर्गी शहर भाजपा अध्यक्ष शिवशरण भरमा,शंकर हलकुडे, गुरुनाथ धुत्तर्गी, मंजू पाटील, रागवेंन्द्र कोलाटे, शिवनिंगपा काळी, निलेश नागूर,शम्मू भंगर्गी व जि. प शाळेचे माजी केंद्र प्रमुख चांदसाहेब बागवान व आदी मैंदर्गी नागरिक व वृत्तपत्र वाचक उपस्थित होते.




## वैचारिक प्रेरणा देण्याचे सामर्थ्य वाचनात आहे प्रा.डॉ.भीमाशंकर बिराजदार

✔ **अक्कलकोट** : प्रारंभीच्या काळात मिळेल ते पुस्तक वाचा एकदा वाचनाची गोडी लागली आणि आवड निर्माण झाली की मग कथा, कविता, वैचारिकता असलेली पुस्तके वाचा यामुळे प्रगल्भता प्राप्त होते .बैठक प्राप्त होते. आणि तुमचा प्रवास सुखकारक बनते जीवनाचा अर्थ कळतो.हे सामर्थ्य वाचनात आहे. म्हणून तरुणांनी वाचनातून प्रेरणा घ्यावी असे आवाहन प्रा.डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी श्री रामलिंगेश्वर सार्वजनिक वाचनालय व श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय आयोजित भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. अजित पट्टणशेट्टी यांनी प्रास्ताविक कले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिध्देश्वर घोंगडे यांनी केले. वाचकांनी व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास राजकुमार. बाळीकाई, सौ.आशाताई बाळीकाई, ग्रंथपाल काशिनाथ ऐवळे, शेळगे, वाचक विद्यार्थी उपस्थित होते. आभार प्रदर्शन महेश पट्टणशेट्टी यांनी केले.



## हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशालेत वाचन प्रेरणा दिन व जागतिक हात धुवा दिन साजरा

✔ **अक्कलकोट** : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला,हन्नूर येथे आज शनिवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी भारताचे अकरावे राष्ट्रपती, मिसाईल मॅन म्हणून सर्वश्रुत असलेले भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९१व्या जयंती निमित्त व डॉ. कलाम यांना वाचनाची ,लेखनाची खूप आवड होती. त्यांच्या या छंदाचा विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन वाचन छंद जोपासावा, त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उदात्त हेतूने भारत सरकारने डॉ. कलाम यांचा जन्म दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतल्याने साजरा करण्यात आले तर आज जागतिक हात धुवा दिन असल्याने हात धुवा दिन साजरा करण्यात आले. प्रारंभी प्रशालेचे सन्माननिय मुख्याध्यापक श्री. विलास बिराजदार सर यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच प्रशालेचे पर्यवेक्षक श्री. अशोक साखरे सर यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकाने मस्तक सुधारते व सुधारलेले मस्तक कुणा पुढेही नतमस्तक होत नाही, वाचाल तरच वाचाल असे सांगून मोबाईल, दूरदर्शन मुळे वाचन छंदाकडे होत असलेले दुर्लक्ष लक्षात आणून देऊन वाचनाचे महत्त्व पटवून दिले .व निरोगी आरोग्याकरिता हात धुण्याचे व स्वच्छतेचे महत्त्व सांगितले व कोरोना काळात आलेल्या अनुभवाची आठवण करून दिली. तर कलाशिक्षक श्री. राजेंद्र यंदे यांनी हात धुण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. याप्रसंगी हन्नूर आरोग्य उपकेंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. वैजनाथ बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य स्वच्छतेविषयी घ्यावयाची काळजी याविषयी माहिती सांगितली. यावेळी आरोग्य सेविका सौ. सुंगधी मॅडम, आरोग्य सेवक श्री. विजय कोरे, प्रशालेचे जेष्ठ शिक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, श्री. सरदार मत्तेखाने, श्री. निंगप्पा बिराजदार,प्रा. रमेश शिंदे प्रा. रवींद्र कालीबत्ते सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक व सुत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. अप्पासाहेब काळे यांनी केले तर आभार स्वप्नाली जमदाडे यांनी मानले.

## युवासेना सोलापूर जिल्हा विस्तारकपदी उत्तम आयवळे यांची निवड

✔ **अकलूज** : शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे) युवासेनेच्या जिल्हा विस्तारक पदी उत्तम सदाशिव आयवळे यांची पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखी युवासेनाप्रुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशावरून युवासेना राज्य सचिव वरुण सरदेसाई यांनी नियुक्ती केली आहे. आयवळे हे मुळचे सांगोला तालुक्यातील वाढेगाव या गावचे सुपुत्र असून अनेक वर्षांपासून ते अंबरनाथ येथे वास्तव्यास आहेत. विद्यार्थी सेने पासुन ते शिवसेनेत सक्रिय असून अंबरनाथ नगरपालिकेत नगरसेवक व आरोग्य



समितीवर सभापती म्हणुन काम पाहिले आहे.आयवळे यांच्या या कार्याची दखल युवासेनाप्रुख त्यांच्यावर सोलापूर जिल्ह्याची विस्तारक म्हणुन जबाबदारी सोपवली आहे. संपूर्ण जिल्ह्यात युवासेना ताकदीने उभा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## आबासाहेब पवार यांची तालुकाध्यक्षपदी निवड

✔ **उत्तर सोलापूर** : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या करमाळा तालुकाध्यक्षपदी आबासाहेब विजय पवार वरिष्ठ सहाय्यक सरचिटणीसपदी - दत्तात्रय विलास सुतार कनिष्ठ सहाय्यक यांची एकमताने निवड करन्यात आली. पंचायत समिती करमाळा येथे संघाच्या वतीने राजेश देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.



यावेळी कार्याध्यक्षपदी - वरिष्ठ सहाय्यक सुजाता पारेकर, उपाध्यक्षपदी- कनिष्ठ प्रशासन अधिकारी माधुरी सपाटे यांची सर्वनुमते निवड करणेत आली. यावेळी सुरेश जाधव , दिनेश बनसोडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी अविनाश जरांडे लेखाधिकारी सिकंदर फकीर मान्यवर उपस्थित होते. सूत्र संचालन सुरेश जाधव, आभार दिनेश बनसोडे यांनी मानले.



## संतदास अध्यात्मिक ज्ञान संस्कार गुरुकुलची पायाभरणी

✔ **नातेपुते** : संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचवावेत या भावनेने गुरुवर्य गाथामुर्ती रामभाऊ महाराज राऊत व गुरुवर्य धनंजय महाराज कदम यांच्या प्रेरणेतून संतदास अध्यात्मिक ज्ञान संस्कार गुरुकुल फोंडशिरस येथे होत आहे . त्याची नुकतीच पायाभरणी करण्यात आली. लक्ष्मण तुकाराम गोरे यांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर दोन गुंठे जमिन गुरुकुलास दान केली आहे.

या भूमिपूजनास ह.भ.प नाना महाराज पांढरे, ह.भ.प बबन वाघमोडे, ह.भ.प नागेश महाराज गोरे, ह.भ.प नागेश महाराज कुलकर्णी, पुरुषोत्तम दाते, हरिश्चंद्र महाराज, माधव महाराज, केंगार, बाळू पवार, रामभाऊ महाराज, आदट महाराज, दुधाळ महाराज, अशोक महाराज, विष्णू शेंडे, सचिन गोरे, दत्तात्रेय गोरे आदी उपस्थित होते.

## वृक्षारोपण करुन जपल्या आजीच्या आठवणी

✔ **माढा** : माढा तालुक्यातील सोलंकरवाडी येथे दि. ११ऑक्टोबर रोजी सौ. गंगुबाई दत्तू भांगिरे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले.

सामाजिक रितीरिवाजाप्रमाणे त्यांच्या राजाराम व मोहन या मुलांनी अग्निडाग देऊन अंत्यसंस्कार केला आजीच्या मृत्यूनंतर तिची आठवण सदैव अबाधित राहावी. त्यातून समाजासमोर एक आदर्श निर्माण व्हावा आणि पर्यावरणाचे रक्षण व्हावे या ध्यासातून पांडुरंग पाटील, अरुण बातखबर, संजय बातखबर, विक्रम भांगिरे, हनुमंत भांगिरे, किशोर भांगिरे, हेमा शिंदे, अनिता बाबर, सारिका बोधले, विजयश्री जाधव, प्रियांका भोसले या नातवंडांनी शेतात तिच्या अस्थींने आंब्याच्या रोपट्याचे वृक्षारोपण करून आजींच्या आठवणी बरोबरच तिचा प्रेमाचा धागा जिवंत ठेवला आहे व वृक्षारोपण करून समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे. या उपक्रमामुळे भांगिरे परिवाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.






## ठाकरे शिवसेना गटाच्या मशालीचे यमाई देवीच्या द्वारात पूजन

✔ **उत्तर सोलापूर** : सोलापूर शिवसेना पक्षाचे निवडणूक चिन्ह मशालिचे पूजन व यमाई देवीची महाआरती शिवसेना उपजिल्हा प्रमुख विक्रांत काकडे यांच्या हस्ते, शिवसेना उत्तर सोलापूर तालुका प्रमुख संजय पौळ यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली.

याप्रसंगी युवासेना उपजिल्हाप्रमुख प्रसाद नीळ, महिला आघाडीच्या परिणीता शिंदे, युवासेना तालुका प्रमुख अजिंक्य देशमुख, विभाग प्रमुख सदाशिव सलगर, विभाग प्रमुख अच्युतराव बाभळे, विभागप्रमुख सचिन घोडके, छावा प्रतिष्ठान अध्यक्ष तुषार साठे, गुळवंची गावचे शाखाप्रमुख विष्णु भोसले, राजेंद्र घाटे, शाखाप्रमुख प्रमोद गवळी, शाखाप्रमुख विष्णु माळी, विद्यार्थी सेनेचे तालुका प्रमुख सोहन जगताप, युवासेनेचे अभिषेक पवार, शाखाप्रमुख पांडुरंग मळगे, उपशाखा प्रमुख अण्णासाहेब गडदे, ग्रामपंचायत सदस्य त्र्यंबक इंगळे यांची उपस्थिती होती. यावेळी पौळ यांनी येणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्वच निवडणूकांमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या यांच्या शिवसेनेला आपण घवघवीत यश संपादन करण्यासाठी शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिलजी कोकिळ यांच्या आदेशानुसार, शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख गणेश दादा वानकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा भगवा झेंडा फडकविण्यासाठी आपण सर्वजण मिळून प्रयत्न करणार आहोत. यावेळी नशिर शेख, लक्ष्मण मुळे, गणेश गोफणे, दत्ता गरड, रंगनाथ गुरव, नवनाथ जगताप, प्रभाकर इंगळे, प्रशांत चव्हाण, अभिमन्यु गवळी,पृथ्वीराज पौळ, विनोद जगताप, अभिमान धुमाळ, अजित महापूरे, प्रवीण गोडसे, विकास ब्राम्हणकर, उमेश नारायनकर, अभिजित यादव, धनाजी धनवडे, गोपाल सुरवसे, समर्थ मुडके, सागर तिखंडे उपस्थित होते.

## सब ज्युनिअर बास्केटबॉल जिल्हा संघ निवड चाचणी

✔ **अकलूज** : महा बास्केटबॉल असोसिएशन तर्फे दिनांक २८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान १३ वर्षाखालील राज्य अजिंक्यपद स्पर्धा कोल्हापूर येथे आयोजितकरण्यात येणार आहे. सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सोलापूर शहर व जिल्हा अमॅच्युअर बास्केटबॉल असोसिएशन तर्फे दि.२० व २१ ऑक्टोबर २०२२ रोजी सेलिब्रेशन मैदान येथे निवड चाचणी घेण्यात येणार आहे.



ज्या खेळाडूंची जन्मतारीख १जानेवारी २००९ किंवा त्यानंतर असेल त्यांनी मूळ जन्म दाखला व आधार कार्ड सह दि.२० ऑक्टोबर २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी संघटना सदस्य अनिल देशपांडे (९४२१५८८९४३) व अनिल जाधव (९४२१०२४३६१) यांच्याशी संपर्क साधावा असे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील व सचिव एम .शफी यांनी आवाहन केले आहे.

## चैतन्य पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील चैतन्य ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन डॉ मिलींद गुळभिले यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सुरुवातीला मयत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहुन सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली. सचिव रघुनाथ नरळे यांनी कामकाज पत्रीकेतील विषयाचे वाचन केले.

पतसंस्थेचे एकुण ६६५ सभासद आहेत तर २०२१-२२ या आर्थिक वर्षात संस्थेची वार्षिक उलाढाल एक कोटी ८६लाख ११हजार रुपये एवढी झाली असुन संस्थेकडे सर्व प्रकारच्या ७९ लाख ७० हजार रुपये एवढ्या ठेवी आहेत तर संस्थेने १८ लाख रुपये एवढे कर्ज वाटप केले आहे. एकुण कर्ज वसुली २६ टक्के एवढी झाली आहे. संस्थेस ३२००० हजार रुपये एवढा नफा झाला आहे. सलग दोन वर्ष कोरोनामुळे कर्ज वसुली झाली नाही. संस्थेने एकुण ५४ थकबाकि दारावर सोलापूर येथील सहकार न्यायालयात दावे दाखल केले असुन त्यापैकी २८ दाव्यांचा निकाल संस्थेच्या बाजुने लागला आहे. यावर्षी संस्थेकडे ९ आडिटरनी नियुक्ती साठी मागणी केली होती त्यामधुन पी एम माने यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली आहे. यावेळी चेअरमन डॉ मिलींद गुळभिले यांनी कोरोना काळात सुद्धा पतसंस्था सुरु होती .कर्ज वेळेवर भरुन सहकार्य करावे व पुढील कारवाही टाळावी असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

सदर सभेस व्हा चेअरमन अमीनखान पठाण, मिनाक्षीदेवी देशमुख, नामदेव देशमुख, आरिफखान पठाण, राजेंद्र जामदार, महादेव तावरे,संग्राम पाटील, महादेव वाघमारे, नामदेव माळी,जिजाबा वाघमारे, दामोदर लोखंडे, राजेंद्र लोखंडे, जहांगीर शेख,नानासाहेब देशमुख, यांच्या सह अनेक मान्यवर यावेळी मोठया संख्येने उपस्थीत होते.या वार्षिक सर्वसाधारण सभेवेळी प्रास्ताविक सचिव रघुनाथ नरळे यांनी केले,विशेष सहकार्य विठ्ठल जाधव, गणेश ढेकळे व पिग्मी एजंट यांनी केले. फोटो -चैतन्य ग्रामीण पतसंस्थेच्या वार्षीक सर्वसाधारण सभेवेळी बोलताना चेअरमन डॉ मिलींद गुळभिले समोर उपस्थित सभासद व संचालक उपस्थित होते.

# माळशिरसमध्ये कायमस्वरूपी प्रांत अधिकाऱ्याची नेमणूक करावी

## पालकमंत्री विखे-पाटील यांना रिपाइंचे विविध मागण्यांचे निवेदन

✔ **श्रीपूर** : माळशिरस उपविभागीय महसूल कार्यालयाकडे कायमस्वरूपी प्रांत अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी.माळशिरस तालुक्यातील तलाठी यांच्याकडे तीन-तीन गावांचा अतिरिक्त पदभार असल्याने ताण येत आहे. हा ताण कमी करण्यासाठी रिक्त पदे तात्काळ भरण्यात द्यावीत, अशा विविध मागण्योच निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका यांच्या वतीने सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली श्रीपुर येथे देण्यात आले. वेळापूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालय किंवा ट्रॉमा किअर सेंटर मध्ये रूपांतर करण्यात यावे.

माळशिरस तालुक्यातील आरोग्य विभागाकडील आरोग्य उपकेंद्र, प्राथमिकआरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणची अधिकारी कर्मचारी सर्व रिक्त पदे त्वरित भरण्यात यावीत. अकलूज शहरानजीक शासकीय जागेमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वस्तीगृहाच्या इमारतीचे अद्यावत बांधकाम तात्काळ सुरू करावे. सदाशिवनगर सह माळशिरस तालुक्यामधील शेती महामंडळासह विविध शासकीय जागेवर अनेक



वर्षापासून वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांना ती जागा तात्काळ मोजणी करून मालक सदरील त्यांचे नाव लावण्यात यावे. वेळापूर येथे बस स्थानक नसल्याने विद्यार्थी बाहेरगावचे प्रवासी यांची गैरसोय होत आहे त्यामुळे या ठिकाणी सुसज्ज एसटी बस स्थानक व्हावे. वेळापूर येथे शासकीय विश्रामगृह व्हावे. माळशिरस तालुक्यातील छोट्या-मोठ्या गावांना वाड्या-वस्त्यांना जोडणारे प्रमुख रस्ते खड्डेमुळे झाल्याने हे रस्ते दुरुस्तीसाठी मोठा निधी उपलब्ध करून रस्त्याची त्वरित दुरुस्ती करण्याचे आदेश संबंधित विभागांना द्यावेत.भूमी अभिलेख कार्यालय माळशिरस येथील कर्मचारी अधिकारी यांची रिक्त पदे असल्याने शेतकऱ्यांची कामे प्रलंबित राहतात त्यामुळे रिक्त पदे त्वरित भरावीत.वेळापूर शहराच्या वाढत्या नागरिकीकरणामुळे स्वच्छ पिण्याच्या पाण्याची पाणीपुरवठा योजना राबवावी. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी कारखाना स्थळी साखर शाळा त्वरित सुरू करण्यात याव्यात. तसेच माळशिरस तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी मुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना विना अट तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई त्वरित द्यावी. मागासवर्गीय सुशिक्षित बेरोजगार मुलांना उद्योग व्यवसायासाठी बिनव्याजी पाच लाखापर्यंत कर्ज तात्काळ मिळावे. आपण सोलापूर जिल्ह्याचे लोकप्रिय पालकमंत्री

## संतोष माने प्रकरणाची पुनरावृत्ती टळली

# पुण्यात एसटी बसची आठ वाहनांना धडक; सहा गंभीर



सुराज्य/पुणे

**पुण्यातील पाषाण-सुस खिंडीजवळ भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. बोरिवली-सातारा या शिवशाही बसणे रस्त्यावरच्या सात ते आठ वाहनांना धडक दिली. यात वाहनांचे मोठे नुकसान झाले असून सहा जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. गाडीचे ब्रेक फेल झाल्याने ही घटना घडली असल्याची माहिती समोर येत असली तरी चालक मद्यधुंद अवस्थेत तर नव्हता ना, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेने संतोष माने प्रकरणाची आठवण ताजी झाल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे.**

याबाबत प्रत्यक्षदर्शिंनी दिलेली माहिती अशी की, बोरिवली ते सातारा शिवशाही एसटी बस ही सुस खिंडीतून जात असताना या बसणे रस्त्यावरून चाललेल्या गाड्यांना अचानक धडक देण्यास सुरुवात केली. यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांची एकच धावपळ उडाली.

एसटीचा वेग जास्त असल्याने तिने सात ते आठ वाहनांना जोरदार धडक दिली. यामुळे काय होतंय ते काहींच कळेना अशी लोकांची अवस्था झाली होती. मात्र, ब्रेक फेल झाल्याने ही घटना घडली असे प्रत्यक्ष नागरिकांनी सांगितले आहे. या घटनेत चार चाकी गाड्यांसह एका मोटार बाईकचे देखील मोठे नुकसान झाले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत. या घटनेचा व्हिडिओ देखील समोर आला आहे.

एसटी चालक संतोष माने याने २५ जानेवारी २०१२ रोजी सकाळी स्वारगेट डेपोतील एसटी बस ताब्यात घेऊन ती भर रस्त्यात बेफाम चालवून त्याने ९ जणांना चिरडले होते. या भीषण घटनेत ३७ जण जखमीही झाले होते. बसने दिलेल्या धडकेमुळे रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या २५ वाहनांचा चक्काचूर झाला होता. या प्रकरणी, शिवाजीनगर न्यायालयात वर्षभर खटला चालला होता.

न्यायालयाने ८ एप्रिल २०१३ रोजी संतोष मानेला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. मात्र, त्यानंतर सुप्रीम कोर्टाने ही शिक्षा रद्द करत जन्मठेप ठोठावण्याचा निर्णय घेतला होता.

## 'रात्री के यात्री'चा दुसरा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला

**पुणे :** हंगामा प्लेवर 'रात्री के यात्री' चा दुसरा सीझन लॉन्च केला आहे. या कार्यक्रमात दूरदर्शन आणि सिने-क्षेत्रातील नामवंत कलाकार रश्मी देसाई, शरद मल्होत्रा, शक्ती अरोरा, मोनालीसा, शेफाली जरीवाला, अदा खान, भावीन भानुशाली, अबिगेल पांडे.प्रियल गोर, मोहित अबरोल, मीरा देवस्थळे आणि आकाश दाबाडे दिसणार आहेत. अनिल व्ही कुमार यांचे दिग्दर्शन, हंगामा ओरिजनल्सच्या साथीने अनिल व्ही कुमार प्रॉडक्शन निर्मितीसाह्य या कार्यक्रमाला लाभले आहे. सिद्धार्थ रॉय म्हणाले, 'रात्री के यात्री'चा पहिला सीझन मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाल्याने, आम्हांला अशाच आणखी प्रभावी कथा तयार करायला भाग पाडले.रात्री के यात्री २ अभूतपूर्व सादरीकरणासह संपूर्ण नवीन प्रकारची कथा सादर करत आहे. अनिल कुमार म्हणाले, 'प्रेक्षकांकडून मिळालेला हृदयस्पर्शी प्रतिसाद मला प्रेरणा देणारा ठरला.

## मराठा समन्वयक रमेश केरे यांचा आत्महत्येचा प्रयत्न

सुराज्य/पुणे

**मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक रमेश केरे यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे. सोशल मीडियावर बदनामी केल्याचा आरोप करत त्यांनी फेसबुक लाईव्ह करत विष प्राशन केले आहे. मुंबईत त्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. सध्या त्यांच्यावर जेजे रुग्णालयात उपचार सुरु आहे.**



अलिकडेच मराठा क्रांती मोर्चाची एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. ज्यामध्ये केरे यांच्यावर पैसे घेतल्याचा आरोप झाला होता. ही ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यामुळे सोशल मीडियावर माझी बदनामी केल्याचा आरोप करत मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक रमेश केरे यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. केरे यांच्या कृत्यामुळे मराठा क्रांती मोर्चाला मोठा धक्का बसला आहे.

## २१ लाखांचा गुटखा मंठा येथे जप्त

**जालना :** मंठा येथे २१ लाख ८० हजार ५०० रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. या कारवाईमध्ये एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले, तर एक आरोपी फरारी आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पोलिस अधिकाऱ्यांसह मंठ्यातील इनाम गल्लीत छापा टाकला. या वेळी मोठ्या गोण्यामध्ये पानमसाला, गुटखा साठवलेला आढळून आला.

दरम्यान, २१ लाख ८० हजारांचा गुटखा व पान मसाला अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी जप्त करून गोदाम सील केले आहे. अवैध साठवणूक करणाऱ्या शेख आवेज शेख आरिफ (रा. अहमदपुरा, मंठा, ता.मंठा) ताब्यात घेण्यात आले. तर एका व्यक्तीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम ५९ व भादंवि कलम १८८,२७३ व कलम ३२८ अन्वये गुन्हा नोंद झाला आहे.

## गुंतवणुकीच्या आमिषाने नऊ लाखांचा गंडा

सुराज्य/पुणे




शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने एकाची नऊ लाख ४० हजारांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी एका महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुष्पा मैत्री (वय ३०, रा. उत्तर कसबा, सोलापूर) असे गुहा दाखल केलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत अनुजकुमार गुप्ता (वय ३८, रा. खराडी) यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मैत्री आणि गुप्ता ओळखीचे आहेत. मैत्रीने गुप्ता यांना शेअर बाजारात गुंतवणुकीचे आमिष दाखविले होते. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे सांगण्यात आले होते. पैसे घेतल्यानंतर मैत्रीने तक्रारदारास परतावा दिला नाही. गुप्ता यांनी विचारणा केली. तेव्हा मैत्रीने गुंतवणुकीसाठी दिलेल्या पैशांचा अपहार केल्याचे उघडकीस आले.फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक रेवले तपास करत आहेत.

## पेंच व्याघ्रप्रकल्पाला राष्ट्रीय सन्मान; स्कॉच पुरस्कारांसाठी निवड



सुराज्य/पुणे

**व्याघ्रप्रकल्प क्षेत्रात इको-रिस्टोरेशनचा प्रकल्प यशस्वीरीत्या राबविल्याबद्दल पेंच व्याघ्रप्रकल्पाला राष्ट्रीय पातळीवरील स्कॉच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, शिकारीविरोधात केलेल्या आक्रमक आणि यशस्वी कारवायांकरिता नागपूर प्रादेशिक वनविभागालादेखील सन्मानित करण्यात आले आहे.**

पेंच व्याघ्रप्रकल्पांतर्गत तोतलाडोह वसाहत क्षेत्रात इको रेस्टोरेशन प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. विविध शासकीय यंत्रणांचा या प्रकल्पात सहभाग आहे. या प्रकल्पाच्या उल्लेखनीय कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली. हा प्रकल्प राबविताना २७२ हेक्टर जमिनीची निवड करण्यात आली. या वनप्रदेशातील वनस्पती, प्राणी आणि इतर वन्यजिवांची माहिती एकत्र करण्यात आली.

येथील वसाहतीतील ५६ जुन्या इमारती नष्ट करण्यात आल्या आणि सगळ्या मलबाही हटविण्यात आला. या जंगलात उगवलेल्या अनावश्यक वनस्पती, गवत याचेदेखील उच्चाटन करण्यात आले. काळी माती आणि सेंद्रीय द्रव्ये वापरून जमिनीची मशागत करण्यात आली.

या भागात वृक्षारोपण करणे आणि कुरणनिर्मिती याकरिता रोपवाटिकादेखील करण्यात आली. येथे मियावाकी पद्धतीने अटल घनवन योजनेंतर्गत वृक्षारोपण आणि कुरणनिर्मिती करण्यात आली. बंधारे बांधणे, वनतलाव तयार करण्यात आले, मृदासंवर्धन अशा विविध उपाययोजना राबविण्यात आल्या.

या संपूर्ण कामासाठी पेंच व्याघ्रप्रकल्पांना सुवर्ण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## पालिका निवडणुकीत भाजपा-मनसे युती?

सुराज्य/मुंबई

**भाजपा नेते आशिष शेलार मनसे अध्यक्ष राज ठाकरेंची भेट घेतली आहे. आशिष शेलार राज ठाकरेंच्या भेटीसाठी त्यांचे निवासस्थान शिवतीर्थवर दाखल झाले आहेत. या भेटीमागचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. महत्त्वाचे म्हणजे, राज ठाकरे यांनी शनिवारी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. त्यानंतर लगेचच आशिष शेलार राज ठाकरेंच्या भेटीला पोहोचल्याने चर्चांना उधाण आले आहे.**



राज्यात सत्तांतर झाल्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले होते. गणेशोत्सवात राज ठाकरेंनी त्यांची भेटही घेतली होती. यामुळे मनसे आता भाजपासोबत युती करणार अशी चर्चा पुन्हा एकदा रंगली होती. त्यामुळे आगामी पालिका निवडणुकीत नवं राजकीय समीकरण पहायला मिळेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. मनसे नेते मात्र आपण स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याचे सांगत आहेत.

दरम्यान आशिष शेलार यांनी अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणूक तसंच महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंची भेट झाल्याची चर्चा आहे. याबाबत अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. राज ठाकरे यांनी शनिवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली.

मुख्यमंत्र्यांची शासकीय निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्यावर राज ठाकरे पोहोचले होते. पुणेकरांना महापालिकेनं पाठवलेल्या मिळकत कर वसुलीच्या नोटीसांसदर्भातील एक पत्र देण्यासाठी राज ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याची माहिती पक्षाकडून देण्यात आली आहे.



## निष्ठावंत भडकले; बावनकुळेंना घेराव घालणार

**सांगली :** जिल्ह्यातील भाजपच्या निष्ठावंतांनी थेट पक्षाविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे. २०० कार्यकर्त्यांसह मुंबईतील भाजपा प्रदेश कार्यालयासमोर आंदोलनाचा निर्णय निष्ठावंत कार्यकर्त्यांनी घेतला आहे. आमच्या बाबत पक्षाचे धोरण बदलले नाहीतर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना घेराव घालण्याचा इशारा देखील सांगलीतील जुन्या भाजप कार्यकर्त्यांनी दिला आहे. मूळ भाजप कार्यकर्त्यांना पक्षात डावलण्यात येत असल्याचा आरोप करत जिल्ह्यातील मूळ निष्ठावंतांनी सांगलीतील बैठकीत हा निर्णय घेतला आहे.

सांगली जिल्ह्यातल्या निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांच्या मनात गेल्या काही महिन्यांपासून खदखद सुरू आहे. पक्षामध्ये नव्याने दाखल झालेल्यांना मान आणि मूळ निष्ठावंत कार्यकर्त्यांनी डावलण्यात येत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या निष्ठावंतांनी पक्षाविरोधात थेट बंडाचा झेंडा फडकवला आहे.सांगलीमध्ये जिल्ह्यातल्या निष्ठावंत भाजपा कार्यकर्त्यांची लोकमान्य टिळक स्मारक मंदिरात बैठक पार पडली.

गेल्या अनेक दिवसांपासून हे निष्ठावंत कार्यकर्ते बैठका घेऊन आपली भूमिका मांडत असूनही, जिल्हा अथवा प्रदेश कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची विचारपूस केली जात नसल्याचा सूर बैठकीत उमटला. सांगलीतील २०० कार्यकर्त्यांसह मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयासमोर आंदोलनाचा निर्णय घेत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना घेराव घालून जोरदार निदर्शने करण्याचा इशाराही या बैठकीदरम्यान देण्यात आला.

# ज्योतिरादित्य शिंदे यांचा शाही राजमहाल

## जेवण वाढायला चांदीची ट्रेन, ३५०० किलोंचे झुंबर

सुराज्य/ग्वालिअर

**ज्योतिरादित्य शिंदे यांचा जय विलास पॅलेस हा ग्वालिअरची शान असल्याचे बोलले जाते. ४ हजार कोटी किंमत असलेल्या हा भव्य-दिव्य राजमहाल पर्यटकांसाठी नेहमीच आकर्षणाचे केंद्र ठरतो. या राजमहालाच्या भव्य-दिव्यतेचे किस्से ऐकल्यानंतर लोकांनाही इथे जाण्याचा मोह आवरता येत नाही.**

या महालात शिंदे राज परिवारातील सदस्य अजूनही राहतात. त्यामुळे सामान्य नागरिकांना आत जाण्याची परवानगी नाहीये. मात्र, काही खास पाहुण्यांना मात्र राजमहालाचा पाहुणचार अनुभवायला मिळतो. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासाठी ज्योतिरादित्य शिंदे यांच्या जयविलास पॅलेसमध्ये डिनर पार्टी आयोजित करण्यात आली आहे. अमित शहा पहिल्यांदाच जय विलास पॅलेसमध्ये जाणार आहेत.

**जयाजीराव शिंदे यांनी बांधला होता महाल**

शिंदे घराण्याने या राजमहालाचे बांधकाम केले आहे. १८७४ साली जयाजीराव शिंदे यांनी हा महाल बांधला. जयाजीराव शिंदे या ग्वालिअरचे महाराजा होते. जयविलास पॅलेसचे बांधकाम १२,४०,७७१ स्क्वेअर फूटमध्ये करण्यात आले आहे. वास्तुविशारद सर मायकल फिलोज यांनी काम केले आहे. महाल बांधण्यासाठी टस्कन शैलीसह कोरिंथियान आणि इटालियन शैलींचा प्रयोग केला गेला आहे. १८७४मध्ये जेव्हा वास्तूचे बांधकाम करण्यात आले तेव्हा त्याचा खर्च १ कोटी रुपये आला होता. आज या महालाची किंमत ४ हजार कोटींपर्यंत पोहोचली आहे.

जय विलास पॅलेसची खासियत म्हणजे जेवणाच्या टेबलवर असलेली चांदीची ट्रेन. खास पाहुण्यांसाठी या चांदीच्या ट्रेनमधून जेवण वाढलं जातं. ट्रेन धावण्यासाठी टेबलवर रूळदेखील बनवण्यात आले आहेत. ही चांदीची ट्रेन महालाची शान अधिक वाढवते.




**४०० खोल्यांचा शाहीथाट**

राज महालात ४०० खोल्या आहेत. त्यातील काही खोल्या सामान्य नागरिकांसाठी खुल्या करण्यात आल्या आहे. महालाच्या आतच संग्रहालय बनवण्यात आलं आहे. तिथे सामान्य नागरिकांना जाण्याची परवानगी आहे. मात्र, आतील भागात कोणालाही जाण्याची परवानगी नाही. महालाच्या इतर खोल्या या राजपरिवारातील सदस्यांसाठी आहेत.

**तीन हजार किलोंचे झुंबर**

या महालात जगातील सगळ्यात मोठे झुंबर लावण्यात आले आहे. हे झुंबर ३५०० किलोंचे असून १४० वर्षांपासून ते महालाच्या छताला टांगले आहे. काही तज्ज्ञांच्या मते हे झुंबर लटकवण्याच्या आधी छत किती मजबूत आहे हे तपासण्यात आले होते. बेल्जिअमच्या कामगारांकडून हे झुंबर तयार करण्यात आले आहे. राजमहालात इतक्या किलो वजनाचे झुंबर लावण्याआधी छतावर हत्ती चढवण्यात आले होते. जेणेकरून महालाच्या मजबुतीचा अंदाज येईल. या शाही झुंबराची खूप चर्चाझाली होती.



**किंग एडवर्ड यांचा भारत दौरा**

हा महाल बांधण्यामागे एक उद्देश होता. तो म्हणजे वेल्सचे राजकुमार किंग एडवर्ड यांचा भारत दौरा. किंग एडवर्ड यांचे भव्य स्वागत करण्यासाठी या अलिशान महालाचे निर्माण करण्यात आले.

४०० खोल्या असलेल्या या महालातील ३५ खोल्यांमध्ये संग्रहालय करण्यात आले आहे. १९६४मध्ये या ३५ खोल्या सर्वसामान्य जनतेसाठी खुल्या करण्यात आल्या.

**शाही बग्गी**

जय विलास पॅलेसच्या ट्रस्टी ज्योतिरादित्य शिंदे यांच्या पत्नी प्रियदर्शनीराजे शिंदे या आहेत. महालाच्या आत अजूनही प्राचीन वस्तू जपून ठेवल्या आहेत. खासकरून छताच्या सिलिंगवर जडवलेले सोने आणि हिरे आणि शाही बग्गी अजूनही महालाची सुंदरता वाढवतात. त्याचबरोबर महालाच्या आत अनेक ठिकाणी सुंदर नक्षीकाम पाहायला मिळते. त्याचबरोबर शिंदे घराण्याच्या पूर्वजांचे फोटोही पाहायला मिळतात.



## शिवाजीनगर बाळे येथून दुचाकी पळवली

**सोलापूर :** शिवाजीनगर बाळे येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डीएस.५९५३ ही हँडल लॉक करून ठेवलेली असताना त्यावेळी अज्ञात चोरट्याने मुद्दामून लबाडीने डुप्लिकेटच्या चिवा वापर करून चोरून नेली आहे.ही घटना दि.१० ते १३ ऑक्टोंबर दरम्यान घडली.याप्रकरणी सागर परमेश्वर पारधे (वय-२७,रा. मुळेगाव तांडा) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कटारे हे करीत आहेत.

## दुचाकीच्या धडकेत एकजण जखमी

**सोलापूर :** दुचाकीच्या धडकेत एक जण जखमी झाल्याची घटना दि.१४ ऑक्टोंबर रोजी रात्री पावणे दहा वाजण्याच्या सुमारास मार्कंडेय स्विमिंग टँक जवळ घडली. याप्रकरणी कांतू लक्ष्मीराजन



येमूल (वय-४१,रा.दत्तनगर मार्कंडेय स्विमिंग टँक,सोलापुर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अभिनय विलास बुगडे (वय-३२,रा.तेलंगी पाच्छा पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांचे वडील लक्ष्मीराजन लक्ष्मीपती यमुल (वय-७२) हे घराकडे जात असताना भरधाव वेगाने आलेल्या दुचाकी क्रमांक एम.एच.१३.बीएच.२३०४ या मोटरसायकल वरील चालकाने फिर्यादी यांच्या वडिलांना धडक देऊन त्यांना जखमी केले आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत.

## शेत जमीन नावावर करण्यासाठी मुलाने आईला ठेवले डांबुन

**सोलापूर :** शेत जमीन नावावर करण्यासाठी मुलाने आईला गाडीत घालून डांबून ठेवून पळून नेल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.१४ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास झळकी येथे घडली. याप्रकरणी श्रीकांत गुरुबाळ बुक्के (वय-२७, रा.गु.मैलार, झळकी, ता.इंडी, जि.विजापूर, सध्या नारायण वस्ती, वेरना हॉटेलच्या पाठीमागे विजापूर रोड,सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून महेश गुरुबाळ




बुक्के, प्रशांत पुजारी, प्रकाश कागर (सर्व रा.झळकी) व रोहन जाधव (रा.सैफूल) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांचा भाऊ महेश व त्यांच्यासोबत फिर्यादीच्या गावातील राहणारे वरील संशयित आरोपी यांनी संगणमत करून फिर्यादी यांची आई सुशीला यांना झळकी येथील शेत जमीन नावावर करून घेण्यासाठी त्यांच्या सोबत आणलेल्या स्कार्पिओ क्रमांक एम.एच.१३.बीएन.२११८ या गाडीत घालून फिर्यादी यांच्या आईला दाबून ठेवण्याच्या उद्देशाने पळवून नेले.असे फिर्यादित म्हटले आहे.या घटनेची नोंद विजापूर नाका पोलीस ठाण्यात झाली असून, या घटनेचा पुढील तपास पोसई मुलाणी हे करीत आहेत.

# नवोदित वकिलांनी अडथळ्यांच्या शर्यतीला घाबरू नये

## सरन्यायाधीश उदय लळित यांचे आवाहन; सुपुत्राचा सन्मान पाहुन सोलापूरकर भारावले

**सुराज्य/सोलापूर**

माझ्या वकिली व्यवसायामध्ये कुटुंब, मित्र, सोलापूरकराचे योगदान आहे. तरूण नवोदित वकिलांनी पॅशन म्हणून वकिली करावी. या व्यावसायात सुरूवातीला अनंत अडथळे येतात, ठेचा बसतात या अडथळ्यांच्या शर्यतीला घाबरू नका, पुढे चालत रहा, असे आवाहन देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश उदय लळित यांनी केले.

महाराष्ट्र, गोवा बार कौन्सिलच्या वतीने हुतात्मा स्मृती मंदिरात आयोजित राज्यस्तरीय वकील परिषदेत सरन्यायाधीश लळित बोलत होते. यावेळी सोलापूरचे सुपुत्र देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश म्हणून त्यांनी शपथ घेतल्याने त्यांचा सोलापूरकरांच्या वतीने मानपत्र, स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. यावेळी देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दीपांकूर दत्ता, सोलापूरचे रहिवासी असलेले न्यायाधीश एम. एस. कर्णिक, एन. जे. जमादार, विनय जोशी, राज्याचे महाधिवक्ता डॉ. आशुतोष कुंभकोणी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. शब्बीर अहमद औटी, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष मिलिंद थोबडे आदी उपस्थित होते.

सोलापूर ही माझी जन्मभूमी आहे. या गावात माझे शालेय शिक्षण झाले. जन्मगावाचे ऋणानुबंध कायम आहेत, इथले दोस्त, वर्गमित्र यांच्याशी आजही संपर्कात आहे. मी ३९ वर्षे वकिली व्यवसायात आहे. मला वकिली व्यवसातून उदंड किर्ती, मान, पैसा सर्व मिळाले. आता सामाजिक बांधिलकीतून समाजासाठी जे आहे ते परत करायचे आहे. वकिलांनी मूल्यांची शिदोरी घेऊन स्वत:वर विश्वास ठेवून मार्गक्रमण करावे, अडथळे पार होतील. आज निम्म्याहून जास्त युवांची संख्या देशात आहे. येणाऱ्या काळात युवकांच्या हातात देश असेल असे लळीत या वेळी मार्गदर्शन करताना म्हणाले. ग्रंथालय आणि पुस्तकांचा आधार घेवूनच आम्ही शिखर गाठले, सध्या इंटरनेटच्या जमान्यात तुम्हाला संशोधन, अभ्यासासाठी प्रचंड साधने आहेत. युट्यूबसुद्धा तुम्हाला वकिलांचा युक्तीवाद पाहायला मिळेल, सदैव सचोटीने काम करा, कक्षा भव्य आहेत, असेही सरन्यायाधीश लळित यांनी सांगितले.

वकील परिषदेचे उदघाटन लळित यांनी केले. ॲड थोबडे यांनी प्रास्ताविकातून बार कौन्सिलची माहिती आणि कार्याचा आढावा घेतला. बार कौन्सिलतर्फे शिक्षण, कार्यक्रमांची शिबीरे घेऊन नवोदित वकिलांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. १५ वर्षात ५०० शिबीरे घेतली असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी मान्यवरांच्या हस्ते ई-गव्हर्नन्सचे प्रकाशन केले. लळित यांच्या हस्ते बार कौन्सिलच्या डिजीटायजेशनचे कळ दाबून लोकार्पण करण्यात



### ■ सोलापूरचे चार रत्न : सुशीलकुमार शिंदे

वकिलांनी न्यायालयात न घाबरता वादविवाद करून सामान्य नागरिकांना न्याय द्यावा. सोलापूरच्या मातीतल्या माणसाने न्यायव्यवस्थेत आपला ठसा उमटवल्याने सोलापूरकरांचा उर भरून येतो. चार हुतात्मा यांच्या पद्धतीने सोलापूरचे चार रत्न उदय लळित, विनय जोशी, एन.जे. जमादार आणि आशितोष कुंभकोणी आहेत. सर्वांनी सामाजिक न्यायासाठी योगदान द्यावे. बार कौन्सिलमधून खेड्यातील, मागास समाजातील वकिलांनी मदत करावी. जिल्ह्यातून आणखी एक मुख्य न्यायाधीश तयार व्हावा, अशी अपेक्षा माजी केंद्रीयगृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केली

### ■ श्रमाशिवाय ज्ञान वाढणार नाही : दीपांकूर दत्ता

सरन्यायाधीश लळित यांच्या आठवणी, न्यायालयात ताकदीने आपली बाजू मांडणारे, सामान्यांना न्याय देणारे ते आहेत. नवोदित वकिलांनी सर्व कायद्यांचा अभ्यास काळजीपूर्वक करून कायदे जाणून घ्यावेत. श्रमाशिवाय आपले ज्ञान वाढणार नाही. जीवनाला महत्व देवून नम्रतेने भाषेवर प्रभूत्व वाढवावे, असे न्यायाधीश दीपांकूर दत्ता यांनी सांगितले.

### ■ पैशासाठी वकिली करू नका : आशितोष कुंभकोणी

सोलापूरचा माणूस न्याय व्यवस्थेच्या मुख्य स्थानावर पोहोचला, याबाबत नितांत अभिमान आहे. विनम्र स्वभाव, संयमी वृत्तीचे, कोणालाही अपशब्द न बोलणारे, चौकटीबाहेर विचार करणारे सरन्यायाधीश लळित आहेत. त्यांचे गुण नवोदित वकिलांनी घ्यावेत. नवोदितांनी पैशासाठी वकिली करू नये, पैशाकडे लक्ष न देता सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम करा, असे आवाहन कुंभकोणी यांनी यावेळी केले.

आले. यावेळी लळित कुटुंबातील सदस्य सविता लळित सरकारी वकील उज्ज्वल निकम, सरन्यायाधीश यांचे वडील निवृत्त न्यायमुर्ती उमेश लळित, पत्नी अमिता लळित, श्रीमती झूमा दत्ता, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मनन कुमार मिश्रा आदींसह वकिल उपस्थित होते.

## तणनाशक फवारणी केल्याने सोयाबीनचे मोठे नुकसान

**■ नुकसान भरपाई मिळण्याची शेतकरी आडके यांची मागणी**

**सुराज्य/सोलापूर**

शेकड या तणनाशक औषधाची फवारणी केल्यामुळे तीन एकरवरील सोयाबीन पिक जळाल्याने मोठे नुकसान झाले असून, याची नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी उत्तर देगाव येथील शेतकरी अजित



आडके यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. शेतकरी आडके म्हणाले, सोयाबिनच्या पिकात गवत वाढले होते.

त्यामुळे तणनाशक शेकड औषधाची फवारणी केली होती. त्यांनतर पिके जळू लागल्यामुळे तक्रार कुंभार वेस येथील बसवेश्वर कृषी केंद्राकडे केले. त्यांनी यावर उपाय म्हणून १ हजार ३०० रुपयांचे टॉनिक दिले. मात्र त्यानेही काहीच फरक पडले नाही. बसवेश्वर कृषी केंद्राचे दिलेल्या शेकड या तणनाशक औषधामुळे मोठे नुकसान झाले आहे. त्याविषयी त्यांच्याकडे नुकसान भरपाईची मागणी केली असता त्यांच्याकडून उडवा उडवीचे उत्तरे आले आहेत. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे ही तक्रार केली असून, त्यांनी शेकड या औषधांमुळे पिकांचे ४० टक्के नुकसान झाल्याचा अहवाल दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या बसवेश्वर कृषी केंद्रावर त्वरित कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यावेळी राजकुमार नागणे, महादेव धबाले आदी उपस्थित होते.

## कवी औटी यांना मृत्युंजयकार जीवनगौरव

**सोलापूर :** अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे यांचा अतिशय सन्मानाचा मृत्युंजयकार शिवाजीराव सावंत जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ कवी देवेंद्र औटी यांना जाहीर झाला आहे.



प्रचंड जनसंपर्क ही ज्यांची ओळख आहे. काव्यकुटुंब' च्या माध्यमातून अनेक नवोदितांना सातत्याने व्यासपीठ देणारे, ज्येष्ठ कवी देवेंद्र औटी यांचे सेवाकार्य ग्राह्य धरून त्यांना यंदाचा सदर पुरस्कार पुरस्कार जाहीर केल्या बाबतचे पत्र राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे यांनी दिले. सदर पुरस्कार २० ऑक्टोबर रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात डॉ. सुवर्णा पवार यांचे अध्यक्षते खाली भरणाऱ्या अठराव्या अखिल भारतीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन समारंभात मान्यवरांकडून प्रदान केला जाणार आहे.




## प्रिसीजन गप्पाच्या हास्यजत्रेतून उडाले हास्याचे फवारे

**सुराज्य/सोलापूर**

लेखक आणि विनोदी अभिनेते समीर चौगुले अन् सहकलाकारांनी सांगितलेल्या किश्श्यांनी हास्यजत्रेत विनोदाचे फवारे उडाले. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या मालिकेतील कलाकारांचा 'महाराष्ट्राची हास्यजत्रा - बिहाइंड द सीन' या कार्यक्रमाने शिवछत्रपती रंगभवन सभागृहात झालेल्या तीन दिवसीय प्रिसीजन गप्पाचा रविवारी समारोप झाला.

प्रारंभी प्रिसीजन उद्योग समूहाचे चेअरमन यतीन शहा, प्रिसीजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, प्रिसीजनचे कार्यकारी संचालक करण शहा, प्रिसीजन फाउंडेशनच्या संचालिका मयुरा शहा यांच्या हस्ते कलावंतांचा सन्मान करण्यात आला.

अभिनेत्री शुभांगी भुजबळ यांनी 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या मालिकेतील लोकप्रिय विनोदी कलाकारांना बोलते केले. दूरचित्रवाणीच्या पडद्यावर प्रेक्षकांना दिसणाऱ्या विनोदा बरोबरच पडद्यामागे घडणाऱ्या अनेक विनोदांचे किस्से यावेळी कलाकारांनी सांगितले.

लेखक आणि अभिनेते समीर चौगुले, दिग्दर्शक सचिन गोस्वामी, कलाकार पृथ्वीक प्रताप, रसिका वेंगुर्लेकर, ओंकार राऊत, वनिता खरात यांनी अनेक किस्से सांगितले. कलाकारांनी सांगितलेल्या किश्श्यांवेळी सभागृहात एकच हशा पिकत होता. प्रेक्षकांसोबतच्या घटना, प्रेक्षकांची दाद, अपेक्षा, लेखनाची प्रक्रिया कलाकारांनी सांगितले. यावेळी अभिनेते गौरव मोरे यांनी लंडनहून आणि लेखन समितीचे निरीक्षक सचिन मोटे यांनी मुंबईहून सोलापूरकर रसिकांशी ऑनलाईन संवाद साधला. समीर चौगुले, सचिन गोस्वामी, कलाकार पृथ्वीक प्रताप, रसिका वेंगुर्लेकर, ओंकार राऊत, वनिता खरात यांनी सांगितलेल्या किश्श्यांमुळे रसिकांना पोट धरून हसायला भाग पाडले.

### अन् आत्महत्या टळली....

एका महिलेच्या पतीने आत्महत्या केली. पत्नीने आत्महत्येचा विचार केला. मात्र हास्यजत्रा पाहून मी आत्महत्येचा विचार बदलला अशी चिठ्ठी एका महिलेने मला आणून दिली. मराठा बटालियनचे कर्नल येऊन कौतुक करून गेले. भारतरत्न लता मंगेशकर, अमिताभ बच्चन, डॉ.विकास आमटे अशा अनेकांनी कौतुक केले. आम्ही भरून पावलो. अशा हळव्या घटनाही त्यांनी यावेळी सांगितल्या.




## ए.जी.पाटील तंत्रनिकेतनमध्ये पालक-विद्यार्थी मेळावा

**सोलापूर :** शांती एज्युकेशन सोसायटी संचलित ए. जी. पाटील तंत्रनिकेतनमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता पालक विद्यार्थी मेळावा घेण्यात आला.

कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे कॅम्पस् डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. ए. चौगुले, प्रथम वर्ष इन्चार्ज प्रा. व्ही. आर. आवटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, कार्यकारी संचालक, प्रमुख पाहुणे रवींद्र आडगे, उद्योजक आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. संस्थेचे कॅम्पस् डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.




ए. चौगुले यांनी संस्था सुरू झाल्यापासून गेल्या १४ वर्षातील संस्थेच्या प्रगतीचा अहवाल सादर केला. याअंतर्गत त्यांनी उपस्थितांना तंत्रनिकेतन ही विद्यार्थ्यांच्या करिअरकरीता कशाप्रकारे एक चांगली संधी आहे याचे विश्लेषण केले. ए. जी. पाटील तंत्रनिकेतन हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर भर देत त्यांच्या सर्वांगिण विकासावरसुद्धा भर देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, कार्यकारी संचालक यांनी त्यांच्या शैक्षणिक वाटचालीबाबत माहिती देत तंत्रनिकेतन ही एक व्यवसाय निर्मितीची कशाप्रकारे संधी आहे. हे उपस्थितांना सांगितले. प्रमुख पाहुणे रवींद्र आडगे, उद्योजक यांनी तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता उद्योग धंद्यात उपलब्ध संधींबाबत मार्गदर्शन केले. प्रथम वर्ष इन्चार्ज प्रा. व्ही. आर. आवटे यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील शैक्षणिक वेळापत्राबाबत वर्षभर चालणाऱ्या शैक्षणिक कामकाजांबाबत पालक व विद्यार्थ्यांना माहिती दिली.

प्रा. व्ही. आर. आवटे यांनी पालकांचे मान्यवरांचे व उपस्थित शिक्षकांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. एन. गवंडी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. तसेच सर्व विभागप्रमुख यांचे सहकार्य लाभले.

## परतीच्या पावसामुळे कारखान्याचा गळीत हंगाम लांबणीवर

**पिलीव :** सध्या सोलापूर जिल्हा सह महाराष्ट्रात परतीच्या पावसाने हाहाकार घातला आहे. राज्यातील साखर कारखाने १५ऑक्टोबरपासून सुरू करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. यामुळे सर्व साखर कारखाने गाळपासाठी सज्ज झाले आहेत. पण सध्या सर्व त्र परतीचा पाऊस चांगला पडत आहे. यामुळे मात्र सगळीकडे शेतात पाणी व चिखल आहे.सर्व रस्त्यावर पाणी साचले आहे.

यामुळे ऊसतोडणी करणे अवघड झाले आहे. ऊसतोडणी कामगार, टोळया सुध्दा सज्ज आहेत पण पावसामुळे काहीच करता येईना अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. बऱ्याच ठिकाणी सध्या पावसामुळे ऊस तोडणे किंवा शेतातून शेतकऱ्यांना ऊस काढणे मुश्कील झाले आहे यामुळे कारखानदारांना सुध्दा मोठी अडचण झाली आहे कारखाना सुरू केला तर पावसामुळे ऊस तोडणे अवघड आहे त्यामुळे पाहिजे तेवढा ऊस उपलब्ध न झाल्यामुळे कारखाना बंद करावा लागणार अशी विचित्र परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. पाऊस थांबून वापसा कधी येणार त्यानंतर सुरळीत ऊस तोडणी होईल असे चित्र सध्या पावसामुळे निर्माण झाले आहे.

# विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

**सुराज्य/पंढरपूर**

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, साखर आयुक्त शेखर गायकवाड, आमदार शहाजी पाटील यांच्या उपस्थितीमध्ये आज झाला. विठ्ठल सहकारी साखर कारखान्यासाठी अध्यक्ष अभिजित पाटील यांना मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून आर्थिक मदत केली आहे. यापुढे आमची तीच भूमिका असणार असल्याचे भाजपाचे नेते तथा आमदार प्रवीण दरेकर यांनी सांगितले.

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा ४१ वा गळीत हंगाम शुभारंभ दरेकर यांच्याहस्ते रविवारी करण्यात आला. यावेळी आमदार शहाजीबापू पाटील, साखर आयुक्त शेखर गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. कारखान्याचे संचालक दत्तात्रय विश्वनाथ नरसाळे यांच्या हस्ते कलश पूजन करण्यात आले. दरेकर म्हणाले, एखादा कार्यकर्ता जेंव्हा चांगले काम करतो तेंव्हा तो कोणत्याही पक्षाचा असला, तरी त्याच्या पाठीमागे सर्वांनी उभा राहिले पाहिजे. शेतकऱ्यांना एफआरपी



साठी आंदोलने करूनही संपूर्ण रक्कम कारखान्यांकडून मिळत नाही, त्यासाठी शेखर गायकवाड यांच्यासारखे सक्षम अधिकारी असतील तरच शेतकऱ्यांना न्याय मिळतो. विठ्ठल कारखाना गत हंगामात बंद अवस्थेत असूनही तो ३ महिन्यात चालू करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम अभिजित पाटील यांनी केले आहे.

आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले , कारखाना सुरू करून अभिजित पाटील यांनी शेतकरी सभासदांचा खऱ्या अर्थाने दुवा घेतला असून अशा तडफदार तरुण कार्यकर्त्याला पाठबळ देणेसाठी त्यांना विधानपरिषदेवर पाठविण्याचे काम प्रवीण दरेकर यांनी करावे. साखर आयुक्त शेखर गायकवाड म्हणाले, आपल्या संपूर्ण देशातून ११२ लाख मे.टन साखर निर्यात केली असून, यापैकी महाराष्ट्र राज्यातून ७० लाख टन साखर परदेशामध्ये गेली आहे. यावर्षीही विक्रमी साखरेचे उत्पादन होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व कारखान्यांचे गाळप हे १५ एप्रिलपर्यंत पूर्ण होईल असे नियोजन करण्यात आलेले आहे. जे कारखाने वेळेत ऊस नेतील व ऊस बिल थकविणार नाहीत, अशा कारखान्यांनाच ऊस देण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले. अभिजित पाटील म्हणाले , गेल्या सिझनला कारखाना चालू झाला नाही. यावर्षी कारखाना पूर्ण क्षमतेने चालणार असून त्यासाठी लागणारी तोडणी वाहतूक यंत्रणा सज्ज असून गळितासाठी ३६ हजार ३१६ एकर उसाची नोंद झालेली आहे. त्यापासून अंदाजे १२ लाख टनाचे गाळपाचे उद्दिष्ट आहे. कारखान्याचे आर्थिक नियोजन करून कर्जाची वेळेत परतफेड करणार आहे. सर्व सभासद शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण ऊस कारखान्यास गळितास देऊन हंगाम यशस्वी पार पाडण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले.

स्वागत व प्रास्ताविक तुकाराम मस्के यांनी केले. प्र.कार्यकारी संचालक श्री डी. आर.गायकवाड यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी कारखान्याच्या उपाध्यक्षा प्रेमलता रोंगे व सर्व संचालक मंडळ, डॉ. बी.पी.रोंगे,धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील, मुंबई बँकेचे संचालक श्री विठ्ठलराव भोसले, साखर उपआयुक्त संजयकुमार भोसले, शिवाजीराव काळुंगे उपस्थित होते.